दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३१ | मंगळवार, दि.०७ ऑक्टोबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रू | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-31 | Tuesday, Dt.07 October 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

### असे आहे बीड जिल्ह्यातील नगराध्यक्ष पदांचे आरक्षण

- अनुसूचित जाती महिला : बीड
- ओबीसी महिला : माजलगाव
- ओबीसी : अंबाजोगाई
- सर्वसाधारण महिला : परळी
- सर्वसाधारण : गेवराई, धारूर

प्रत्येक नगरपालिकेच्या अंतर्गत असणाऱ्या लोकांना या आरक्षण सोडतीमुळे धक्का बसला आहे. विशेषता बीड अंबाजोगाई माजलगाव अशा शहरातील प्रस्थापित राजकीय लोकांची मोठी अडचण झाल्याचे यातून दिसत आहे.

## नगरपरिषद, नगरपालिकांची सोडत जाहीर

# १७ नगरपरिषदा एससी, ३४ नगरपरिषदा ओबीसी, तर ६८ नगरपरिषदा खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव

मुंबई /वृत्तसंस्था

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यीतल नगराध्यक्षपदाच्या आरक्षणाची सोडत जाहीर करण्यात आली आहे. एकूण २४७ नगरपालिका आणि १४७ नगरपंचायतींसाठी ही सोडत मंत्रालयात काढण्यात आली. या प्रक्रियेनंतर ३३ नगरपरिषदांपैकी १७ नगरपरिषदांमध्ये अनुसूचित जातीच्या महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला जानेवारी महिन्याअखेर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पाडण्याचे निर्देश दिल्यानंतर प्रशासन तयारीला लागले आहे. त्यानुसार आज मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात मंत्री माधुरी मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत काढण्यात आली. आपल्या शहराचे नगराध्यक्षपद कोणत्या प्रवर्गाकडे जाणार, याबाबत लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्सुकता होती.

ओबीसी महिलांसाठी राखीव नगरपरिषदा

भगूर, इगतपुरी, विटा, बल्हारपूर, धाराशिव, भोकरदन, जुन्नर, उमरेड, दौंड, कुलगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, माजलगाव, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर-नवाबपूर, औसा, कर्जत, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, रोहा, कुरडुवादी, धामणगावरेल्वे, वरोरा.

राज्यातील ६८ नगरपरिषदा महिलांसाठी खुल्या प्रवर्गात राखीव

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खुल्या

(उर्वरीत पान २ वर)

### कोणत्या नगरपरिषदांना मिळाले आरक्षण

राज्य सरकारने जाहीर केलेल्या यादीनुसार, खालील १७ नगरपरिषदांसाठी अनुसूचित जाती महिला प्रवर्ग आरक्षित करण्यात आले आहे.देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज, बीड आणि शिरोळ या नगरपरिषदांमधील स्थानिक कार्यकर्त्यांनी तयारी सुरू केली असून, अनेक ठिकाणी महिलांमध्ये उमेदवारीसाठी हालचाली दिसून येत आहेत.

### ३४ नगरपरिषदा ओबीसी महिलांसाठी राखीव

६४ नगरपरिषदांपैकी ३४ नगरपरिषदांमधील नगराध्यक्षपद हे ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. ओबीसी महिला प्रवर्गासाठी आरक्षित झालेल्या नगरपरिषदांमध्ये इगतपुरी, भोकरदन, जुन्नर, दौंड, माजलगाव, कर्जत, रोहा यांसारख्या महत्त्वाच्या शहरांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, भगूर, विटा, बल्हारपूर, धाराशिव, उमरेड, कुळगाव बदलापूर, हिंगोली, फुलगाव, मुरुड जंजीरा, शिरूर, काटोल, मूल, मालवण, देसाईगंज, हिवरखेड, अकोट, मोर्शी, नेर- नवाबपूर, औसा, देगलूर, चोपडा, सटाणा, दोंडाईचा वरवडे, बाळापूर, कुरडुवादी, धामणगावरेल्वे आणि वरोरा या नगरपरिषदांचाही समावेश ओबीसी महिला आरक्षित यादीत आहे.

### राज्यातील महिलांना मोठी संधी

या आरक्षण प्रक्रियेत महिलांसाठी मोठ्या प्रमाणावर जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. विशेषतः अनुसूचित जातीच्या महिलांना १७ नगरपरिषदांमध्ये संधी देण्यात आल्याने महिला सक्षमीकरणाच्या दिशेने सरकारकडून सकारात्मक पाऊल उचलल्याचे मानले जात आहे. मोहोळ, ओझर, भुसावळ, शिर्डी, दिग्रस, अकलूज आणि बीडसारख्या प्रमुख नगरपरिषदांमध्ये महिलांना आरक्षण मिळाल्याने स्थानिक राजकारणात नवीन नेतृत्व उदयास येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### अनुसूचित जाती महिला आरक्षण नगरपरिषद

देऊळगावराजा, मोहोळ, तेल्हारा, ओझर, वानाडोंगरी, भुसावळ, घुग्गूस, चिमूर, शिर्डी, सावदा, मैनदर्गी, दिगडोहदेवी, दिग्रस, अकलूज, बीड, शिरोळ.

### नवे नेतृत्व पुढे येणार

राज्य सरकारने आरक्षण प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडल्याचे सांगितले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढावा, तसेच अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय समाजातील महिलांना संधी मिळावी, हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचे सांगण्यात आले. राज्यातील महिलांना नेतृत्वाच्या संधी देण्याच्या दृष्टीने ही सोडत ऐतिहासिक ठरू शकते.

## संभाजीनगर येथे होणाऱ्या मराठवाडाव्यापी हंबरडा मोर्चाच्या पार्श्वभूमीवर



**आज विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या उपस्थितीत होणाऱ्या पुर्वतयारी बैठकीस शिवसेना पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - वरेकर, गिराम**

बीड /प्रतिनिधी


मराठवाड्यातील अतिवृष्टी नंतर शेतकरी आणि पूरग्रस्त बाधित बाधितांचे संसार उध्वस्त झाले आहेत. सरकार अजूनही त्यांना सरसकट मदत जाहीर करत नाही. त्यामुळे कुंभकर्णाची झोप घेतलेल्या सरकारला जागे करण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वाखाली संभाजीनगर येथे निघणाऱ्या हंबरडा मोर्चाच्या पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी आज मंगळवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ३ वाजता शिवसेना नेते मा. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या जिल्हा व्यापी बैठकीला सर्व आजी-माजी पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर आणि जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी केले आहे.

मराठवाड्यातील सर्वच आठही जिल्ह्यांमध्ये निसर्ग कोपला असुन , अस्मानी व

(उर्वरीत पान २ वर)

## अवैध माफियांच्या कर्दनकाळ पूजा पवार आता बीडच्या उपविभागीय पोलीस अधिकारी


**गो तस्करांनी जिवे मारण्याचा प्रयत्न केला पण कर्तव्यात कसूर केली नाही !**



बीड/ प्रतिनिधी

पोलीस दलामध्ये निवड झाल्यानंतर पहिली नियुक्ती पूजा पवार यांना बीडमध्ये मिळाली. मागील सहा महिन्याच्या प्रोबेशनल कालावधीमध्ये त्यांनी दबंग कामगिरी केली. पिंपळनेर पोलीस स्टेशनची जबाबदारी सांभाळताना त्यांनी अवैध धंदे चालकांच्या मुस्क्या आवळून त्यांना सळो की पळो करून सोडले होते. त्यांना आता पोलीस अधीक्षक बीड यांनी बीडच्या डीवायएसपी या पदाचा अधिकृत चार्ज दिला आहे.त्यांनी तो ६ ऑक्टोबर सोमवार रोजी अधिकृत पदभार स्वीकारला. त्यांच्याकडून आता

(उर्वरीत पान २ वर)



प्रभारी पोलीस उपविभागीय अधिकारी असताना पूजा पवार यांनी बीड शहरातील बार्शी नाक्याजवळ गो तस्करांचा पाठलाग करून त्यांना रंगेहात अटक केली. त्यावेळी गो तस्करांनी गाडी अंगावर घालून त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न केला. मात्र त्या मागे हटल्या नाहीत. आरोपींना सोडले नाही. त्यांच्या या धाडसी कारवाईची दखल घेऊन पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी त्यांना विशेष सन्मानपत्र देऊन त्यावेळी गौरव करत त्यांची हिंमत वाढवली होती.



## प्रलंबित दंड वसुलीसाठी जिल्हा पोलीस दलाचे अभियान

**९ लाख ५० हजाराचा दंड वसुल**

बीड (प्रतिनिधी)

शहरातील वाढती वाहतूक आणि अपघातांचे प्रमाण लक्षात घेता, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून आणि अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाईच्या चेतना तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात २८

(उर्वरीत पान २ वर)

## बीड शहराजवळील कामखेडा येथील प्रस्तावित विमानतळ परिसरास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी



बीड /प्रतिनिधी

बीड शहराजवळील कामखेडा येथे प्रस्तावित विमानतळासाठी कामखेडा गावा जवळ जागा निश्चित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने आज एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी बीड शहराजवळील कामखेडा येथील प्रस्तावित विमानतळ परिसरास प्रत्यक्ष भेट देवून पाहणी केली.

या पाहणी दरम्यान प्रस्तावित जागेचे सर्व तांत्रिक व प्रशासकीय पैलू तपासण्यात आले. विमानतळ प्रकल्पासाठी बीडजवळील कामखेडा परिसर अधिक सोयीचा ठरेल, असा निष्कर्ष प्राथमिक चर्चेतून पुढे आला आहे. याठिकाणी राज्य सरकारची दोनशे एकरांपेक्षा अधिक जमीन उपलब्ध असून, जमिनीचा उतार आणि भौगोलिक परिस्थिती विमानतळ उभारणीस पोषक असल्याचे अधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले.या संदर्भात प्रशासनासोबत बैठक घेऊन एकत्रितपणे समन्वयाने याला गती दिली जाईल असे स्पष्ट केले आहे.या प्रसंगी भारतीय विमानतळ प्राधिकरणाचे व्यवस्थापक प्रशांत गुप्ता, महाव्यवस्थापक रोशन दासू कांबळे, उपमहाव्यवस्थापक अनुराग मिश्रा, पि.के. मोरया, सहाय्यक महाव्यवस्थापक अशवाणी कुमार आणि अंजनी कुमारी, महाराष्ट्र विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता राजकुमारी बॅरी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी रवींद्र

(उर्वरीत पान २ वर)

### पालकमंत्री अजितदादांच्या विकासात्मक दृष्टीने बीडला विमानतळ होणारच

विमानतळासाठी एकूण १७० हेक्टर जागा लागणार असुन, यापैकी ८० हेक्टर जागा शासनाकडे उपलब्ध असुन इतर जागेचे भूसंपादन करावे लागणार आहे. विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, जमीन मोजमाप, वन विभागाशी संबंधित सर्व परवानग्या, पाणी पुरवठा आणि रस्ते संपर्क यासह विविध तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती घेवून चर्चा केली. विमानतळ उभारणीसाठी जिल्हा प्रशासन आणि विमानतळ प्राधिकरण यांच्यात समन्वयाने नियोजन पूर्ण करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. यामुळे बीडकारांनी न पाहिलेले मात्र बीडचे विद्यमान पालकमंत्री अजितदादा पवार यांनी प्रत्यक्षात स्वप्नवत विमानतळ बीडला साक्षात साकारण्यासाठी ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहेत. त्यामुळे आता बदलत बीड विकासात्मक बीड म्हणून महाराष्ट्राच्या पटलावर भविष्यात झळकेल यात शंका नाही.

## बीड नगरपालिकेचे नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिलासाठी राखीव

**नगराध्यक्षपदासाठी सौ.मिनाताई भीमराव वाघचौरे यांचे नाव आघाडीवर !**

बीड /प्रतिनिधी

**बीड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद महिला अनुसूचित जमातीसाठी राखीव झाले आहे. बीड नगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच नगराध्यक्षपदी अनुसूचित जातीमधील महिलेला संधी मिळणार आहे. अनुसूचित जाती मधून बीडच्या पहिल्या नगराध्यक्ष होण्याचा मान लोकप्रिय नगरसेवक भीमराव वाघचौरे यांच्या सुविद्य पत्नी सौ मीनाताई वाघचौरे यांना मिळण्याची शक्यता आरक्षण जाहीर होताच सुरू झाल्याने त्या थेट नगराध्यक्ष पदाच्या चर्चेत आल्या आहेत. आता पक्ष काय निर्णय घेतो यावर पुढील राजकीय गणिते दिशा देणारी ठरतील हे नक्की.**

बीड नगर परिषदेचे अध्यक्षपद हे अनुसूचित जातीसाठी राखीव होण्याची शक्यता सुरू झाल्याने निष्कलंक नगरसेवक असलेले भीमराव वाघचौरे यांचे नाव सर्वात पुढे आघाडीवर आले. आरक्षण सोडत निश्चित झाल्यानंतर बीडचे नगराध्यक्ष पद हे अनुसूचित जातीतील महिला प्रवर्गासाठी राखीव झाल्यानंतर या पदासाठी सर्वात आघाडीवर असलेले नाव

(उर्वरीत पान २ वर)



### जनभावना पक्षश्रेष्ठीपर्यंत पोहोचवणारा - भीमराव वाघचौरे

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वेसर्वा ना.अजित दादा पवार यांच्या सह प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे साहेब, आ.धनंजय मुंडे, आ.विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण साहेब आणि जेष्ठ नेते अमरसिंह पंडित साहेब, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडे जनभावनेचा आदर करून पक्षश्रेष्ठीने नगराध्यक्ष पद अनुसूचित जातीमधील महिलांसाठी राखीव झाल्याने या पदासाठी माझे आजपर्यंत नगरपालिकेतील अनुभव आणि प्रामाणिकपणे केलेली जनसेवा लक्षात घेऊन माझ्या उच्चशिक्षित आणि संस्कारक्षम असलेल्या सुविद्य पत्नी सौ मीनाताई वाघचौरे यांना संधी देण्यात यावी. त्यांची उमेदवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाचा झेंडा बीड नगरपालिकेवर फडकवेल असा विश्वास ज्येष्ठ नगरसेवक भीमराव वाघचौरे यांनी दैनिक समर्थ राजयोगशी बोलताना व्यक्त केला.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# प्रवासी सुविधा मिळाली, पण सुरक्षिततेचे काय?

मुंबईतील पदपथ तर आधीच गायब झाले आहेत. रस्त्याच्या कडेला पार्किंग आणि जागोजागी थांबणाऱ्या दुचाकी वाहनांची भर पडल्याने शहरात चालणे आणखी धोकादायक बनू शकणार आहे. या बाईक टॅक्सींमुळे तरुणांना नोकरीची नवी संधी तर मिळेलच पण एक शेवटच्या गल्लीपर्यंत चांगली सेवा मिळू शकेल. कमी अंतराच्या प्रवासासाठीही टॅक्सी बाईकचा उपयोग ठरू शकेल त्याचवेळी रात्रीच्या वेळेस सुरक्षिततेचे काय? दुचाकीच्या अपघाताचे प्रमाण जास्त वाढल्याने वेगाने पोहोचण्यासाठी वाहतुकीच्या नियमांचे सर्रास उल्लंघन करण्यात येईल. याला जबाबदार कोण? हे प्रश्न शेवटी निरुत्तरच राहतात.

गेल्याच आठवड्यातील गोष्ट. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोरील बस थांब्यावर बसची वाट बघत असताना रात्री साडेदहाच्या दरम्यान बस थांब्यावर एक साधारण तिशीतील तरुणी येऊन उभी राहिली, पाच-दहा मिनिटे ती त्या बस थांब्यावर उभी होती. थोड्याच वेळात एक बाईकस्वार तिच्या पुढ्यात उभा राहिला. तिने खिशातून मोबाइल काढला व त्याला काही मोबाइलमध्ये दाखवले. दोघांमध्ये संवाद झाल्यावर ती तरुणी अचानक त्या बाईकस्वाराच्या मागे बसली व निघून गेली. माझ्या मनात धस झाले. हा काय प्रकार होता? ते दोघे लग्न ठरलेले कपल किंवा प्रेमवीर तरी वाटत नव्हते. दोघात संवाद झाला व ती तरुणी त्याच्या खांद्यावर हात टाकून त्या उंच बाईकवर अशी बसली कशी? या विचारात असतानाच दुसऱ्या दिवशी या साऱ्याचा उलगडा करण्याचे ठरवले, मात्र तेव्हाच लक्षात आले, की मुंबईत बाईक टॅक्सी सुरू झाली आहे.

बाईक टॅक्सीबाबत परिवहन विभागाने एक मोठा निर्णय घेतला. ओला, उबेरप्रमाणेच मुंबईत आता मुंबईत बाईक टॅक्सीला परवानगी देण्यात आली. आज रॅपिडो व ओला उबेरसारख्या बाईक सर्व्हिस सुरू झाल्या आहेत. पुढे-मागे या स्पर्धेत आणखीही बलाढ्य कंपन्याही उतरतील यात शंका नाही.

## टि.सी.हरवली आहे

अनिकेत विठ्ठल रंधे रा.अंतरवाली सराटी ता.अंबड जि.जालना आदर्श कला, कॉमर्स, सायन्स ज.आर.कॉलेज जामखेड या विद्यालय ची १२ पास टि.सी.जामखेड ते अंबड प्रवासा दरम्यान हरवली आहे.तरी या नावाची टि.सी.कोणास सापडल्यास या नंबर वर संपर्क साधावा.

मो.९७६३७६७२३८

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३१ दि.२९.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान कैलास शिवाजी घुगरे, रा.शिरनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पृथ्वीराज कैलास घुगरे | मुलगी | १७.१२.२०१७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३३ दि.२९.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान चंद्रहास आगजी गायके, रा.शिरनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सार्थक चंद्रहास गायके | मुलगा | १२.०१.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३४ दि.२९.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान चंद्रहास आगजी गायके, रा.शिरनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | निवेदिता चंद्राहास गायके | मुलगी | २७.०९.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-८३२ दि.२९.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान कैलास शिवाजी घुगरे, रा.शिरनेर ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पृथ्वीराज कैलास घुगरे | मुलगा | २३.०६.२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २९/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६४२ दि.३०.०९.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान मंजुर लाल शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **वडील**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | लाल रशीद शेख | वडील | ०७.०५.२०१५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ३०/ ०९ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती, एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: ७८२/२०२५**
**सुमन विलास सौदरमल विरुध्द निरंक**
**(मार्फत अँड. कारके एस के )**

ज्याअर्थी मनाविलास आश्रुबा सौंदरमल हे दिनांक ०८.०५.२००८ रोजी गौंडगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार

१. सुमन विलास सौंदरमल वय ५४ वर्षे धंदा - घरकाम
रा. संजयनगर गोदामाच्या पाठीमागे गेवराई ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाम विलास आश्रुबा सौंदरमल यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख : १४.११.२०२५

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८११/२०२५**
**लक्ष्मण भगवान खोसे विरुद्ध निरंक**
**(मार्फत अँड गवारे जी.पी. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे भगवान सटवाजी खोसे हे/हया दिनांक. १८/०५/२०२१ रोजी मौजे गायकवाड जळगाव ता.गेवराई, जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-

१.लक्ष्मण पि.भगवान खोसे वय - ५३वर्षे, धंदा - शेती रा.गायकवाड जळगाव ता. गेवराई जि.बीड

२.भुजंग पि.भगवान खोसे वय - ५० वर्षे, धंदा - शेती रा. सदर

३.कमलाबाई भ्र.मदन केसभट वय ४५ वर्षे, धंदा-शेती रा.गायकवाड जळगाव ता. शेवगाव जि. अहिल्यानगर

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास जर सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भगवान सटवाजी खोसे चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३०/९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ७/११/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीण यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ८१९/२०२५**
**उमलबाई विरूध्द निरंक**
**(मार्फत -अ‍ॅड. घोकशे बी.एम. गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे बाळू पि. बाबुराव चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा ता. गेवराई जि.बीड या दिनांक १०/०९/२०२५ रोजी अपेक्स सुपर स्पेशालीस्ट हॉस्पिटील, छ. संभाजीनगर ता. जि. छ. संभाजीनगर येथे मयत झाले. अर्जदार १. उमलबाई प्र. बाबु चव्हाण, वय ७५ वर्षे धंदा, घरकाम, रा. भेंडटाकळी तांडा, ता.गेवराई जि.बीड. २. नयना प्र. बाळू चव्हाण, वय ३४ वर्षे धंदा, घरकाम ता. गेवराई जि.बीड. ३. प्रतिभा पि. बाळू चव्हाण वय १४ वर्षे धंदा, शिक्षण, अ. पा. क. आई नयना भ्र. बाळू चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा, ता. गेवराई जि. बीड. ४. प्रितम पि. बाळू चव्हाण, वय १२ वर्षे धंदा, शिक्षण रा. अ. पा. क. आई नयना भ्र. बाळू चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा, ता. गेवराई जि.बीड ५. ऋषिकेश पि. बाळू चव्हाण वय ०८ वर्षे शिक्षण, अ. पा. क. आई नयना भ्र. बाळू चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा, ता. गेवराई जि. बीड. शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे मयत नामे बाळू पि. बाबुराव चव्हाण रा. भेंडटाकळी तांडा, ता. गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०४/१०/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख ०७/११/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती, एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक: ८१५/२०२५**
**सविता रमेश पवार विरुद्ध निरंक**
**(मार्फत -अँड. बीएम घोक्षे)**

ज्याअर्थी मयत नामे रमेश हिरामण पवार के दिनांक १४.०७.२०२५ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छ. संभाजीनगर ता. जि. छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार

१.सविता रमेश पवार वय ४६ वर्षे धंदा -घरकाम
रा. भेंडटाकळी, ता.गेवराई जि. बीड
२. अर्जुन रमेश पवार वय २१ वर्षे धंदा मजुरी
रा. भेंडटाकळी, ता.गेवराई जि. बीड
३.कृष्णा रमेश पवार
वय १९ वर्षे धंदा शिक्षण
रा. भेंडटाकळी, ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या र घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे रमेश हिरामण पवार ग. भेंडटाकळी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख : १५.११.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७७१ / २०२५**
**आशा भ्र. लक्ष्मण सौंदरमल व इतर वि. निरंक**
**(मार्फत अँड. एस. के. कारके, गेवराई)**

ज्याअर्थी मयत अनुसयाबाई . काशिनाथ सौंदरमल, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड या दिनांक ०४/०७/२००९ रोजी मौजे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले झाल्या आहेत. अर्जदार क. १ आशा प्र. लक्ष्मण सौंदरमल, वय ५७ वर्षे धंदा घरकाम, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ वैभव पि. लक्ष्मण सौंदरमल, वय - २८ वर्षे, धंदा मजुरी, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन अ‍ॅक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताने कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना मंदर मयत अनुसयाबाई प्र. काशिनाथ सौंदरमल, रा. भिमनगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०९/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिलं.

पुढील तारीख:- २९/१०/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

## पान १ वरुन...

**अवैध माफियांच्या कर्दनकाळ ..**

चांगल्या आणि दबंग कामगिरीची अपेक्षा पोलीस दलासह बीड जिल्ह्यातील सामान्य जनतेला आहे.

पोलीस दलामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर बीडमध्ये पूजा पवार यांना पहिली नियुक्ती देण्यात आली. आपल्या सहा महिन्याच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना ज्या ज्या ठिकाणी काम करण्याची संधी दिली त्या त्या ठिकाणी दबंग कामगिरी करत त्यांनी अवैध व्यावसायिकांच्या झोपा उडवल्या. अवैध दारू, बेकायदेशीर वाळू, वेश्याव्यवसाय बेकायदेशीर गुटखा करणाऱ्या माफीयांना सळो कि पळो करून सोडले. त्यांनी आपल्या प्रशिक्षण कालावधी मध्ये अवैध दारूचा मोठा साठा जप्त करून अवैध माफीयांना दणका दिला. जुगार अड्ड्यावर छापे टाकून त्यांच्या झोपा उडवल्या. अवैध वाळू माफीयांच्या मुस्क्या आवळल्या. अवैध गुटखा व्यवसायिकांवर बेधडक कारवाई केली. इतकेच नव्हे तर त्यांनी लॉजवर चालणाऱ्या वेश्याव्यवसायांचा देखील पर्दाफाश करत पीडितांची सुटका करून आरोपींना अटक करण्याचे धाडस केले.खोटे गुन्हे कोणाच्याही प्रेशर खाली दाखल होऊ दिले नाहीत आणि खऱ्या गुन्हेगारांना आपल्या कालावधीत कायद्याच्या कचाट्यातून सुटू दिले नाही. एवढेच नाही तर त्यांनी साध्या एनसी असलेल्या केसेस वर सुद्धा थेट दबंग कारवाई करून धाडस दाखवले.त्यांचा प्रशिक्षणार्थी कालावधी संपल्यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीडच्या रिक्त असलेल्या उपविभागीय पोलीस अधिकारी पदाची अधिकृत सूत्रे सुपूर्द केली आहेत. त्यांनी आपला या पदाचा अधिकृत पदभार सोमवार दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी स्वीकारला त्यांच्या पुढील दबंग कारवाईसाठी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्यावतीने त्यांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

**संभाजीनगर येथे होणाऱ्या..**

सुलतानी संकटात शेतकरी सापडला आहे.शेतकऱ्यांना कसं जीवन जगावं हे कळेनासे झाले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी पुन्हा उभा राहिला पाहिजे.त्याला सरसकट मदत झाली पाहिजे.हेक्टरी ५०,००० हजार रुपये मदत मिळाली पाहिजे.अशा विविध मागण्यांसंदर्भात शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वात व शिवसेना नेते तथा माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब व इतरही शिवसेना नेते यांच्या उपस्थितीत मराठवाड्याची राजधानी संभाजीनगर येथील आयुक्त कार्यालयावर शेतकऱ्यांचा भव्य हंबरडा मोर्चा धडकणार आहे. याची पुर्वतयारी करण्यासाठी बीड जिल्ह्यातून मोठ्या संख्येने शेतकरी व पदाधिकारी घेऊन जायचे आहे. मोर्चाच्या संदर्भात शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादासजी दानवे साहेब आज मंगळवार दि. ७/१०/२०२५ रोजी दुपारी ठिक ३ वाजता बीड शहरातील तहसील कार्यालयासमोर हॉटेल नीलकमल येथे पदाधिकारी व शिवसैनिक यांना मार्गदर्शन करण्यासाठी येणार आहेत. तरी सहाही विधानसभा क्षेत्रातील शिवसेना माजी/आजी पदाधिकारी, महिला आघाडी, युवासेना, किसान सेना व शिवसैनिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे

## पान १ वरुन...

आवाहन जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर व जिल्हाप्रमुख उल्हास भैय्या गिराम यांनी केले आहे.

**बीड शहराजवळील..**

चिंचाणे, जिल्हा अधीक्षक भूमिलेख कृष्णा शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी बीड अमोल सांगुळे आणि वन परिमंडळ अधिकारी बीड देविदास गाडेकर उपस्थित होते.या पाहणी दरम्यान एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडिया आणि महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांनी जिल्हा प्रशासनाने विमानतळासाठी निवडलेल्या जागेची सविस्तर पाहणी केली. यानंतर या समितीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेवून विमानतळ प्रकल्प उभारणीसाठी आवश्यक सुविधांची तपासणी करुन नियोजनावर सविस्तर चर्चा केली.

कामखेडा ठिकाण अधिक व्यवहार्य असून, कामखेडा हे ठिकाण सोलापूर-नाशिक राष्ट्रीय महामार्गापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर आहे. तसेच येथील रस्ते संपर्कही उत्तम आहे. याठिकाणाच्या भौगोलिक रचनेमुळे भूसंपादनाचा खर्च तुलनेने कमी येणार आहे. या पाहणीदरम्यान विमानतळ प्राधिकरण आणि स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वयाने प्रकल्पाचे नियोजन जलद गतीने पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की, विमानतळ प्रकल्पामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला गती मिळेल, तसेच गुंतवणुकीच्या संधींनाही चालना मिळणार आहे. यासाठी सर्व विभागांनी एकत्रित प्रयत्न सुरू केले आहेत.

या विमानतळ प्रकल्पामुळे बीड जिल्ह्यातील परिसराचा विकास आणि दळणवळणाच्या सुविधेत वाढ होणार आहे. तसेच व्यापार, पर्यटन आणि औद्योगिक विकासाला देखील देखील गती प्राप्त होवून रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होणार आहे.

यावेळी मंडळ अधिकारी पेंडगाव अंगद काशीद, ग्राम महसूल अधिकारी कामखेडा गणेश गायकवाड, भूमापक संजय जायभाये, कामखेडा ग्रामपंचायतीच्या सरपंच मीना बेगम अमीर शेख आदींची उपस्थिती होती.

**प्रलंबित दंड वसुलीसाठी..**

पोलीस स्टेशन अंतर्गत ९ ठिकाणी प्रलंबित दंड वसुल अभियान राबविण्यात आले. यावेळी ११०० केसेसचा ९ लाख ५० हजार रुपयांचा एकूण दंड वसुल करण्यात आला.

या अभियान हे पाडळसिंगी टोलनाका, पांगरबावडी पुल, केज टोल नाका, चुंबळी फाटा, धारुर टोलनाका, बर्दापूर टोलनाका, माजलगाव- परभणी टी पॉईट, इटके कॉर्नर, परळी, अंभोरा चेक पोस्ट या ९ ठिकाणी मोहीम राबविण्यात आली. यामध्ये ८ पोलीस निरीक्षक, २३ सहाय्यक पोलीस निरीक्षक २५ पोलीस उपनिरीक्षक, ७८ वाहतुक अंमलदार इतर १७७ अंमलदार ३ आरसीपी प्लाटून यांनी सहभाग घेतला. एकाच दिवशी मोठ्या दंड वसुलीची करण्याची कारवाई केली.

**बीड नगरपालिकेचे नगराध्यक्ष..**

जेष्ठ नगरसेवक भीमराव वाघचौरे यांच्या पत्नी सौ.मिना वाघचौरे यांचे पुढे आले आहे.

## पान १ वरुन...

नगर पालिकेच्या अध्यक्षपदांचे आरक्षण काल मंत्रालयात जाहिर करण्यात आले. बीड न.प.चे अध्यक्षपद अनुसूचित जातीसाठी राखीव होईल अशी शक्यता अगोदरच वर्तवली जात होती. त्यानुसार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित दादा) पक्षाकडून जेष्ठ नगरसेवक भीमराव वाघचौरे यांच्या नावाची जास्त चर्चा सुरु होती. वाघचौरे हे उच्चशिक्षीत असून बी.ए.राज्यशास्त्र ही पदवी त्यांनी प्राप्त केलेली आहे. त्यांच्या पत्नी सुध्दा पदवीधर आहेत. हिंदु मांग (अनुसूचित जाती) प्रवर्गातील असलेल्या वाघचौरे कुटुंबाने गेली ३०-३५ वर्ष हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारावर ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्वावर काम केले. १९९१ साली भीमराव वाघचौरे सर्वप्रथम शिवसेनेचे नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यानंतर पाच वेळा नगरसेवक होण्याचा बहुमान त्यांना जनतेच्या आशिर्वादामुळे प्राप्त झाला. १९९७ साली ते बीड न.प.चे उपाध्यक्ष झाले. त्याच बरोबर आरोग्य,अर्थ व नियोजन या समितीचे सभापती म्हणून सुध्दा त्यांनी काम केले. बीड शहराचा डीपी प्लॅन तयार करण्यामध्ये त्यांची भूमिका महत्वाची ठरली. बीड जिल्हा नियोजन समितीचे सदस्य म्हणून सुध्दा त्यांनी काम पाहिले. त्यांची ही यशस्वी कारकिर्द आणि अखंड लोकप्रियता पाहूनच त्यांना यावेळी नगराध्यक्षपदाची संधी मिळेल अशी बीडकरांना अपेक्षा होती. परंतु काल या पदाचे आरक्षण जाहिर झाल्यानंतर अनुसूचित जाती महिला असे आरक्षण निश्चित झाले. त्यामुळे वाघचौरे समर्थकांची थोडी निराशा झाली असली तरी सर्व कार्यकर्त्यांनी व हितचिंतकांनी वाघचौरे यांच्या पत्नी सौ.मिनाताई वाघचौरे यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी आता पुढे येत आहे.

**नगरपरिषद, नगरपालिकांची सोडत ....**

प्रवर्गातील महिलांसाठी ६८ नगरपरिषदा राखीव केल्या गेल्या आहेत. यामध्ये विविध जिल्ह्यांतील नगरपरिषदा व नगरपंचायतींचा समावेश आहे. यादीमध्ये काही प्रमुख नगरपरिषदा अशी आहेत: परळी वैजनाथ, मुखेड, अंबरनाथ, अचलपूर, मुदखेड, पवनी, कन्नड, मलकापूर-कोल्हापूर, मोवाड, पंढरपूर, खामगाव, गंगाखेड, धरणगाव, बार्शी, अंबड, गेवराई, म्हसवड, गडचिरोली, भंडारा, उरण, बुलढाणा, पैठण, कारंजा, नांदूरा, सावनेर, मंगळवेढा, कलमनूरी, आर्वी, किनवट, कागल, संगमनेर, मुरगुड, साकोली, कुरुंदवाड, पूर्णा, कळंब, चांदूररेल्वे, चांदूरबाजार, भूम, रत्नागिरी, रहिमतपूर, खेड, करमाळा, वसमत, हिंगणघाट, रावेर, जामनेर, पलुस, यावल, सावंतवाडी, जव्हार, तासगाव, राजापूर, सिंदीरेल्वे, जामखेड, चाकण, शेवगाव, लोणार, हदगाव, पन्हाळा, धर्माबाद, उमरखेड, मानवत, पाचोरा, पेण, फैजपूर, उदगीर आणि अलिबाग.

राजकीय समीकरणात बदलाची शक्यता

या आरक्षण घोषणेनंतर स्थानिक पातळीवर राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल घडण्याची शक्यता आहे. काही नगरपरिषदांमध्ये विद्यमान नगराध्यक्षांचे आरक्षण बदलल्याने त्यांच्या जागी नवीन चेहरे उमेदवारीसाठी पुढे येतील. दुसरीकडे, अनेक राजकीय पक्ष महिला उमेदवारांना प्रोत्साहन देण्याच्या तयारीत आहेत. आगामी निवडणुकांमध्ये महिलांच्या सहभागामुळे स्थानिक राजकारणात ताजेपणा आणि स्पर्धा वाढेल, अशी प्रतिक्रिया राजकीय वर्तुळातून व्यक्त होत आहे.

# कर्मयोगी अंकुशराव टोपे वाद-विवाद स्पर्धेचे पारितोषिक वितरण उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांनी वाचन चिंतन आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे डॉ.बी.आर.गायकवाड यांचे मार्गदर्शन

जालना /प्रतिनिधी

अंकुशराव टोपे महाविद्यालयात प्रथमच आयोजित कनिष्ठ महाविद्यालयीन जिल्हास्तरीय कर्मयोगी अंकुशराव टोपे वाद-विवाद स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहात पार पडला. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान आणि पारितोषिक वितरणाचा मान मा. डॉ. बी. आर. गायकवाड प्रशासकीय अधिकारी, म.शि.सं. जालना यांच्या शुभहस्ते संपन्न झाला.

या प्रसंगी डॉ. गायकवाड यांनी उपस्थित स्पर्धकांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांनी सातत्याने वाचन, चिंतन व नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे अत्यंत आवश्यक आहे. वक्तृत्व करताना चेहऱ्यावरील भाव, आवाजातील ठामपणा आणि श्रोत्यांना भावेल अशी भाषा यांचा प्रभावी वापर करा असा मोलाचा सल्ला त्यांनी दिला. तसेच सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, प्राचार्य डॉ. शकील खान, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, श्री. मधुकर शिनगारे आणि श्री. सुरेश चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.विजेत्यांचा गौरव रोख पारितोषिक, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन करण्यात आला.प्रथम क्र. श्री. यश सुरेश शिरसाठ अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना रु ५००१ द्वितीय क्र. कु. शिवांजली नाथा घुले मत्स्योदरी महाविद्यालय अंबड रु.३००१,तृतीय क्र. कु. आरशदराजा आजम शेख बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना रु.२००१, सांघिक विजेतेपद मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड संघाने पटकावले असून त्यांना कायमस्वरूपी ढाल देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन डॉ. शंकर तिकांडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रमोद भांदरगे यांनी मानले.



या सोहळ्यास प्रा. रामप्रसाद भालेकर, प्रा. महादेव माने, प्रा. दत्ता पटाईत, प्रा. मोहन शिंदे, प्रा. बाळासाहेब पवार, प्रा. शोकेत शेख, प्रा. विजयकुमार कुमठेकर, प्रा. गणेश गुंजाळ, प्रा. श्रद्धा कुलकर्णी, प्रा. शुभांगी राऊत, प्रा. सपना शहाणे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोकशाही दिनात चार अर्ज प्राप्त

बीड /प्रतिनिधी

जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये भुसंपादनाचे २ अर्ज,गोण खनीज १ अर्ज आणि १ जमावबंदी १ असे एकूण ०४ तक्रार अर्ज प्राप्त झाले. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात लोकशाही दिन संपन्न झाला.

यावेळी जिल्हा पोलीस मुख्यालय, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग व पाणी पुरवठा विभाग, समन्वय अधिकारी इत्यादी जिल्हा स्तरावरील प्रमुख अधिकारी व ज्या कार्यालयाकडून लोकशाही दिनातील प्रलंबित प्रकरणे होती, ते संबंधित अधिकारी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी यांच्याकडे महसूल संबधित एकूण चार तक्रार अर्ज जिल्हा लोकशाही दिनात प्राप्त झाले असून निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी अर्जावर सुनावणी घेऊन संबधित विभागास १५ दिवसात संबधित प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# भोकरदन येथे शेतकऱ्यांचा आक्रोश फुलला! शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा-शशिकांत शिंदे





**ओला दुष्काळ घोषित करून हेक्टरी रु.५० हजार मदत द्या! रोहित पवारचा इशारा**

भोकरदन /इसरार खान

राज्यातील शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आणि अतिवृष्टीमुळे झालेल्या प्रचंड नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गट तर्फे आयोजित भव्य शेतकरी आक्रोश मोर्चा भोकरदन येथे उपविभागीय कार्यालयावर संपन्न झाला.

या मोर्चात शेतकऱ्यांचा प्रचंड जनस्फोट झाला होता. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करा अशी गर्जना करत प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी राज्य सरकारला थेट इशारा दिला. तर आमदार रोहित पवार यांनी ठाम मागणी करत सांगितले मराठवाडा आणि महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी रु.५०,००० मदत द्या

या वेळी खासदार निलेश लंके यांनी सरकारवर तीव्र टीका करत म्हटले भाजपा सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून जनतेचे लक्ष हटवण्यासाठी जाती-धर्मांमध्ये भांडणे लावते आहे.तर माजी मंत्री राजेश टोपे यांनी सडेतोड प्रतिपादन केले हा लढा सत्तेसाठी नाही शेतकऱ्यांच्या न्यायासाठी आहे

अतिवृष्टी पुर आणि शेतमालाचे नुकसान यामुळे भोकरदन-जाफराबाद परिसरातील शेतकरी अक्षरशः हतबल झाले आहेत.अनेकांच्या घरात आणि दुकानात पाणी शिरल्याने प्रचंड आर्थिक नुकसान झाले. याच पार्श्वभूमीवर माजी आमदार चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वाखाली हा शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

मोर्चात शेकडो शेतकरी, महिला, युवक, व्यापारी, ट्रॅक्टर आणि बैलगाड्यांसह सहभागी झाले होते.कर्जमाफी झालीच पाहिजे शेतकरी विरोधी सरकार हद्दपार करा खाली मुंडके वर पाय सरकारचे करायचे काय अशा घोषणांनी संपूर्ण भोकरदन शहर दणाणून गेले.मोर्चादरम्यान उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या राज्यातील सर्व शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून ७/१२ कोरा करणे.ओला दुष्काळ घोषित करून हेक्टरी रु.५०,००० नुकसानभरपाई. भूमिहीन व शेतमजूर कुटुंबांना रु.२५,००० मदत.माती वाहून गेलेल्या शेतांसाठी एकरी १,००,००० भरपाई. जनावरे मृत झाल्यास मोठ्या जनावरांना रु.७०,००० व लहान जनावरांना रु.१५,००० भरपाई. रब्बी हंगामासाठी बी-बियाणे व खतांसाठी रु.२५,००० मदत. कृषीपंपांचे वीज बिल माफ करून मोफत पीकविमा योजना लागू करावी.शेतकऱ्यांच्या मुलांचे शैक्षणिक शुल्क शासनाने भरावे. पूरग्रस्त व्यापाऱ्यांना घर-दुकान नुकसानीची भरपाई द्यावी. विहिरी मंजुरीतील भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.या ऐतिहासिक आक्रोश मोर्चास आ. शशिकांत शिंदे, आ. रोहित पवार, खासदार निलेश लंके, खासदार डॉ. कल्याणराव काळे, माजी मंत्री राजेश टोपे, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुबभाई शेख आदींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संजय वाघचौरे, डॉ. निसार देशमुख, पांडुरंग तांगडे, जगन्नाथ काकडे, ड. संजय काळबांडे, रमेश सपकाळ, सुधाकर दानवे, प्रा. अंकुश जाधव, वंदना हजारे, कमलताई जेठे यांच्यासह पक्षाचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उत्साहाने सहभागी झाले.

# हसनापुर येथील ग्रामस्थांनी जिल्हा परिषद शाळेला ठोकले कुलूप

शहागड प्रतीनीधी/ घुंगर्डे हादगाव

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथुनच जवळच असलेल्या हसनापुर येथील ग्रामस्थांनी आज सकाळी जिल्हा परिषद शाळेला ठोकले कुलुप. सविस्तर माहीती अशी की, हसनापुर येथील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत शाळा आहे. परंतु गेल्या एक वर्षापासून तेथे एकच शिक्षक असुन विद्यार्थी संख्या ४३ आहे. यासाठी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सरपंच यांनी विस्तार अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की जो पर्यंत शाळेवर कायम शिक्षकाची नियुक्ती करणारं नाही तोपर्यंत शाळेचे कुलूप उघडणार नसल्याचे सरपंच नितीन मिरकड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत मिरकड यांनी सांगितले.



विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे असे ग्रामस्थांनी सांगितले. विस्तार अधिकारी दिनेश शिनगारे यांच्याशी फोनवरून संपर्क साधला असता तात्पुरती शिक्षकाची नियुक्ती देतो असे विस्तार अधिकारी यांनी सांगितले. परंतु ग्रामस्थ व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष जोपर्यंत कायमस्वरूपी शिक्षकांची नियुक्ती करण्यात येणार नाही तोपर्यंत शाळेचे कुलूप उघडणार नाही असा पवित्रा सरपंच व ग्रामस्थांनी घेतला आहे.यावेळी सरपंच नितीन मिरकड, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष चंद्रकांत मिरकड, नारायण सातपुते, तुकाराम सातपुते, किशोर पठाडे, संतोष मिरकड, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# ओंकार वृद्धाश्रमातील ३५जणांना केले ब्लांकेटचे वाटप

भाईश्री च्या वाढदिवसानिमित्त श्री एजन्सीचा उपक्रम

मंठा /प्रतिनिधी

पाथरी- मानवत रस्त्यावर असलेल्या ओंकार वृद्धाश्रमातील ३५जणांना थंडीचा त्रास जाणवु नये म्हणून ३५ जणांना ब्लँकेटचे वाटप रविवार ५ऑक्टोबर रोजी करण्यात आले. याबाबतची माहिती याप्रमाणे ९ऑक्टोबर रोजी जालना येथील श्री रमेशभाई पटेल भाईश्री यांच्या ७६ व्या वाढदिवसाचे औचित साधत सेलू येथील श्री एजन्सी चे वितरक शिवहार शिवणकर यांच्या वतीने पाथरी येथील ओंकार वृद्धाश्रमातील ३५ जणांना थंडीपासून बचाव व्हावा म्हणून ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. यावेळी बसवराज शिवणकार ,ओमकेश शिवणकर,ऋषी शिवणकर ओंकार वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापक गीता सोगे, आदीसह इतर उपस्थित होते. अनाथाची माय सिंधुताई सपकाळ यांची प्रेरणा घेऊन ओंकार वृद्धाश्रमाच्या माध्यमातून समाजसेवा हातून घडावी या उदात्त हेतूने प्रेरित होऊन सुमारे २०१३ मध्ये म्हणजे सुमारे १२ वर्षांपूर्वी पाथरी येथे वैद्यकीय सेवा देणारे डॉ. जगदीश शिंदे यांनी या ओंकार वृद्धाश्रमास सुरुवात केली. प्रारंभी रुग्णालयातच वृद्धांची सेवा करत नंतर पाथरी -मानवत रस्त्यावर सर्व सोयीयुक्त ओंकार वृद्धाश्रम सुरू करण्यात आले. येथे सध्या वीस महिला आणि पंधरा पुरुष असे ३५ जण या मोफत सेवेचा लाभ घेतात.डॉ.जगदीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गीता सोगे, मीना सोगे, संतोष सोळंके, रामभाऊ जोगदंड हे वृद्धांची सेवा करतात. स्वखुशीने आलेल्या आणि कुटुंबाच्या लोकांना आपला त्रास होऊ नये म्हणून वयाची साठी पार केलेल्या ओंकार वृद्धाश्रमातील वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे काम डॉ. जगदीश शिंदे यांच्या हातून सध्या घडत आहे. सेलू, पाथरी, मानवत आणि जिल्ह्यातील अनेक जण आपला वाढदिवस लग्नाचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यासाठी या ठिकाणी येऊन साजरा करत आनंद द्विगुणीत करतात.

# स्वछतेचा पंधरवाडा सलो सायकलिंगमध्ये साईराज लोणकर, सुमित दुनगहू, आकांक्ष ढवळे, रोहीणी मोरेनी मारली बाजी

प्रतिनिधी : जाफराबाद हरी भालके

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त यांच्या जयंतीनिमित्त आदरांजली अर्पण करण्यासाठी २ ऑक्टोंबर हा दिवस स्वच्छ भारत दिवस म्हणून साजरा केला जातो त्याची पूर्वतयारी म्हणून स्वच्छ भारतासाठी स्वयं प्रेरणा आणि सामुहिक कृतीला बळकटी देण्यासाठी वार्षिक स्वच्छता सेवा पंधरवडा पितृपक्ष म्हणून साजरा केला जात आहे जात आहे यावर्षी १७सप्टेंबर ते २आक्टोंबर पर्यंत स्वच्छता ही सेवा पंधरवाडा आयोजित करण्यात आला यात नगरपंचायतच्या वतीने स्वच्छ शहर सुंदर शहर वृक्षरोपण नालेसफाई यासह विविध उपक्रम राबविले या पार्श्वभुमीवर शनिवार रोजी जिल्हा परिषद प्रशालेच्या प्रागणांवर स्लो सायकलिंग स्पर्धा घेण्यात आली घेण्यात आली.

ही स्पर्धा ५ वी ते ७वी व ८ वी १०वी अशा मुला मुलीच्या प्रत्येकी दोन वेगळ्या गटात खेळण्यात आली यात ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता .या स्पर्धेत २०० मीटर व जमिनीवर पाय न टेकवता अति स्लो वेगाने सायकल चालविण्याच्या नियम व अटी बंधन कारक होत्या



यात पीएमश्री जिल्हापरिषद मराठी माध्यमच्या इयत्ता ७ वी तील विद्यार्थी साईराज प्रल्हाद लोणकर याने हे अंतर ९ मिनिटात पार करीत प्रथम क्रमांक पटकवला यात त्याने सलग दुसऱ्या वर्षीही प्रथम येण्याचा मान आपल्या नावे कायम ठेवला आहे तर ७वीतील अजित भोपळे याने द्वितीय, तर श्रेयस उमेश दुनगहु तृतीय स्थानी आहे . इयत्ता ८ वी ते १० वयोगटात प्रथम सुमित सुनील दुनगहु, द्वितीय जावेद असलम पठाण आणि तृतीय क्रमांक दानिश मझहर शेख याने पटकवला आहे

तर मुलींच्या ५ ते ७ वर्ग गटातुन आकांक्षा धनंजय ढवळे हिने प्रथम , आकांक्षा सतीश बदर हिने द्वितीय तर , नम्रता कैलास तळेकर , हिने तृतीय क्रमांक मिळविला तसेच ८ वी तेथे १० वर्गांच्या गटात प्रथम रोहिणी विजय मोरे, द्वितीय प्रतिक्षा सदाशिव गाडेकर व तृतीय क्रमांक श्रावणी वाकडे या विद्यार्थिनी मिळविलेला असून या स्लो सायकलिंगच्या स्पर्धेत यश संपादन केलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांचे,नगराध्यक्ष कविता वाकडे , सीओ सुरज बिस्किटे, नगरसेवक दिपक वाकडे मुख्याध्यापक उमेश दुनगहू, नपचे स्वच्छता निरीक्षक शेख जावेद, बळीराम उखर्डे, साळवे, शिवहरी ढाकणे , विजय वानेरे, लक्ष्मीपती पेद्दी , देशमुख यांच्यासह आदींनी अभिनंदन केले .

# पैठण येथील जुन्या रंगारहट्टी येथे नवरात्र उत्सवातील विजेत्यांचे कौतुक.....!

पैठण /प्रतिनिधी

सालाबादप्रमाणे पैठण शहरातील जुन्या रंगारहट्टी गल्लीत धुमधडाक्यात नवरात्र उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवात सामाजिक प्रबोधनाची उपक्रमे राबविण्यात आली. यावेळी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवात सरगमताई महाराज आगळे यांचे किर्तन ऐकण्यासाठी भाविकांनी गर्दी केली होती. कालिका देवी नवरात्र उत्सवात दररोज मान्यवरांच्या हस्ते आरतींचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे डॉ वैशाली लोहिया व कार्यक्रमाच्या अध्यक्षा शीतल धायगुडे मॅडम यांचा हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

पाककला स्पर्धेत प्रथम पायल ठोंबरे, द्वितीय संगिता चौधरी, तृतीय पुनम जैस्वाल यांनी बक्षीस पटकावले,डोळे बंद करून टिकली लावणे या स्पर्धेत पुजा तोरकडे,कविता गोजरे, सोनाली कबाडी यांनी बक्षीस मिळविले, लिंबू चमचा स्पर्धेत योगिता



वरकड, रोहिणी चौधरी, स्वाती जाधव यांनी विशेष पारितोषिक प्राप्त केले, संगीत खुर्ची स्पर्धेत राणी गोजरे, कावेरी धामुरडे,कल्याणी घुले या विजयी ठरल्या, होम मिनिस्टर स्पर्धेत रंजिता दायमा,संगिता चौधरी, प्रिया जोशी यांनी बाजी मारली, दांडिया स्पर्धेत अटीतटीची रंगली यात पुनम जैस्वाल, वैशाली सोनवणे, दिपाली झारखंडे यांनी विजयश्री खेचून आणली.मटका फोड स्पर्धा अटीतटीची झाली यात उत्कृष्ठ खेळाडू म्हणून प्रिती कुलकर्णी यांनी बाजी मारली.नवरात्रात भजन, किर्तन, सप्तशती पाठ हेही कार्यक्रम भक्तीमय वातावरणात संपन्न झाले.कालिका देवी नवरात्र महिला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचिता गोजरे यांनी केले.भारती जव्हेरी यांनी उपस्थिताचे आभार मानले.

# महात्मा गांधी जयंती ही जगामध्ये आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरी होते - प्राचार्य धनवंत मस्के

## पाटोदा बे. विद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती उत्साहात साजरी

बीड /प्रतिनिधी

दोन ऑक्टोबरच्या दिवशी भारतात अशा दोन व्यक्तींनी जन्म घेतला की त्यांच्यामुळे देशाला जगामध्ये एक वेगळी ओळख मिळाली. एक राष्ट्रपिता महात्मा गांधी ज्यांना आदराने बापू संबोधले जाते आणि दुसरे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री. महात्मा गांधींजींचा जन्मदिवस संपूर्ण देशात 'गांधी जयंती' म्हणून साजरा करतात, तर संपूर्ण जगामध्ये तो 'आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन' म्हणून साजरा केला जातो असे प्रतिपादन प्राचार्य धनवंत मस्के सर यांनी व्यक्त केले.

गुरुवार दि.०२ ऑक्टोंबर २०२५ रोजी बीड तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था बीडद्वारा संचलित पाटोदा बे. विद्यालयाच्या प्रांगणात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य धनवंत मस्के सर यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी सहशिक्षक खोसे भागवत, गदळे रघुनाथ, काटवटे जालिंदर ,जोगदंड शहादेव , काशीद रामेश्वर, अशोक वाघमारे ,आदमाने अजिनाथ, नवनाथ गायकवाड, अरविंद डोळस, चंद्रकांत खेडकर, तिपाले संदीप, जोशी अद्वैत, सेवक शिंदे सखाराम आदींसह विद्यार्थी, विद्यार्थीनीं, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# पाडळी उच्च माध्यमिक विद्यालयात स्व केशरकाकू क्षीरसागर यांची पुण्यतिथी साजरी

शिरूर कासार /वार्ताहर

आदर्श शिक्षण संस्थेच्या संस्थापिका माजी खासदार स्व केशरकाकू क्षीरसागर यांची पुण्यतिथी पाडळी उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी तालुका शिरूर कासार येथे ४ रोजी साजरी करण्यात आली सर्वप्रथम स्व काकू व स्व नानांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य अंगदराव दहिफळे यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर सर्व कर्मचारी वृंद यांनी प्रतिमेला अभिवादन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य अंगदराव दहिफळे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक पर्यवेक्षक भाऊसाहेब सोंडगे माध्यमिक पर्यवेक्षक दीपक रत्नपारखी जेष्ठ शिक्षक रमेश घोडके तुळशीदास थिटे मारुती धांडे आदींची उपस्थिती होती कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य दहिफळे म्हणाले की स्वर्गीय काकूंनी जीवनभर राजकारण करून समाजकारण केले एक महिला लढाऊ खासदार म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला रेल्वे दूरदर्शन रस्ते तलाव आदी सुविधा केशरकाकूंनी जनतेसाठी निर्माण केल्या स्व केशरकाकू दिन दलित दुबळ्या गरीब समाजांच्या माता होत्या वंचित विद्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे मिळावेत म्हणून जिल्ह्यात गावोगावी शिक्षण संस्था उभारून विद्यार्थ्यांना उच्चशिक्षित करण्याचे मोठे कार्य कांकुनी केले काकूंचे हे कार्य चंद्र सूर्य असेपर्यंत अजरामर राहील असे त्यांनी




बोलताना सांगितले या कार्यक्रमास सर्व कर्मचारी वृंद विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा रजनी रजनीताई इंगोले यांनी केले तर आभार महेश उगलमुगले यांनी मानले

# उत्तम पवार आणि उत्तम हजारे यांचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयात सत्कार संपन्न

बीड /प्रतिनिधी

बीड येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा शैक्षणिक आणि सामाजिक कार्यकर्ते उत्तम वामनराव पवार यांना इंदिराबाई गायकवाड चॅरिटेबल ट्रस्ट मुंबई या संस्थेचा समाजभूषण पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आणि दैनिक लोकाशा या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक उत्तम कचरूराव हजारे यांचा



पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांच्या अध्यक्षतेखाली आणि सचिव ॲड. व्ही.बी. मगर यांच्या शुभहस्ते आणि सर्व संचालक राम शिंदे, बाबुलाल पवार,लक्ष्मणराव शिंदे, माजी मुख्याध्यापक व्ही.जी. आवाड आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सत्कार समारंभ उत्साहामध्ये संपन्न झाला.

या कार्यक्रमाच्या प्रारंभी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी उत्तमराव पवार आणि उत्तमराव हजारे यांचा स्वागत सत्कार समारंभ बी.एस धुतालमल आणि ॲड.व्ही.बी. मगर यांनी पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन संपन्न झाला. यावेळी उत्तम पवार यांनी जीवनामध्ये एकनिष्ठतेने कार्य केल्यास आपणास ध्येय प्राप्त करता येते असे उद्गार सत्कार प्रसंगी बोलतांना व्यक्त केले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष बी.एस. धुतालमल यांनी आपण सातत्याने प्रेरणादायी कार्य करून उच्च ध्येय प्राप्तीसाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे असे अध्यक्ष समारोप करताना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक बी.ए. हावळे संचलन संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस. वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमास सुधाकर सोनवणे, या विद्यालयाचे शिक्षक विजय देशमुख, आर.बी. घुले, यु.बी. पवळ, श्रीमती एन.जी.मुंडे, आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही.खरसाडे आणि शिक्षकेतर कर्मचारी एल.बी. हजारे, एस.एस. गायकवाड, भारत कोळेकर, बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना मिठाईचे वाटप करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ चे औचित्य साधून

## बीड जिल्हा सहकार बोर्ड व जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन - प्रा. बबनराव आंधळे

बीड/ प्रतिनिधी

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी वर्ष २०२५ चे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात सहकारी शिक्षण प्रशिक्षण प्रचार व प्रसिद्धीचे कार्य करणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड व बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दिनांक १३ १० २०२५ वार सोमवार रोजी सकाळी ठीक १०.३० ते संपेपर्यंत आय सी हॉल केस के महाविद्यालय बीड या ठिकाणी करण्यात आले आहे.

या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचा विषय सहकारातून समृद्धी असा आहे या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या स्पर्धकास महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे यांच्या वतीने प्रथम क्रमांकास रुपये १००० व द्वितीय स्पर्धकास रुपये ५०० असे पारितोषिक देण्यात येणार आहे.संपूर्ण महाराष्ट्रभर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र राज्य सहकार संघ पुणे यांच्या वतीने करण्यात येणार आहे. वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवतीचा सहकार चळवळीमध्ये सहभाग



वाढावा सहकार चळवळीची माहिती व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात प्रत्येक जिल्ह्यामध्ये वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवती करता सहकार बोर्डाच्या वतीने जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये प्रथम आलेल्या युवक युवती ना महाराष्ट्र राज्य सहकारी संघामार्फत माहे नोव्हेंबर २०२५ मध्ये आयोजित करावयाच्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत थेट प्रवेश दिला जाईल. याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी या स्पर्धेसाठी खालील विषय देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये १) सहकारी चळवळीतून ग्रामीण विकास २) सहकारातून रोजगार निर्मिती ३) सहकारी चळवळीत युवक युवतीचा सहभाग ४) सहकार व खाजगी क्षेत्र ५) सहकारातून नवभारताची निर्मिती ६) सहकारातून समृद्धी. हे सहा विषय यामध्ये दिलेले आहेत.या स्पर्धेचे नियम स्पर्धेत सहभागी होण्याकरिता प्रत्येक स्पर्धकाकडून १०० रुपये प्रवेश फी आकारण्यात येईल स्पर्धेत सहभागी स्पर्धकातून प्रथम व द्वितीय क्रमांक काढला जाईल सहभागी प्रत्येक स्पर्धकाला ७+३=१० मिनिटे असा वेळ देण्यात येईल या स्पर्धेसाठी तज्ञ अभ्यासक यांची परीक्षक म्हणून निवड करण्यात येईल वरील अटीस अधीन राहून आपल्या जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक व जिल्हा सहकार बोर्ड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयास आमंत्रित करून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे तसेच सदरील स्पर्धा पार पाडताना स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्था एनजीओ यांचेही सहकार्य लाभल्यास घेण्यात येईल तरी जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवतींना याद्वारे विनंती करण्यात येत आहे की आपण या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी वरिष्ठ महाविद्यालयातील युवक युवतीने नोंदणी करणे आवश्यक आहे.ही नोंदणी स्पर्धेच्या पाच दिवस अगोदर करणे बंधनकारक आहे. प्रवेश शुल्काची रक्कम १०० रुपये जिल्हा सहकार विकास अधिकारी श्री आर डी वाघमारे साहेब व पी ए कदम साहेब यांच्याकडे नोंदणी करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मोबाईल नंबर ९८ ९० ३७ ९६ ९१ व ९४ २१ ३५ ८८ ६५ या क्रमांकावर संपर्क साधून आपली नोंदणी करून घ्यावी असे आवाहन बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा. बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# भारतीय बौद्ध महासभेच्या वतीन ६९वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात आला

माजलगाव (प्रतिनिधी) भारतीय बौद्ध महासभा तालुका माजलगाव च्या वतीन ६९वा धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात विविध कार्यक्रमाने साजरा करण्यात आला सकाळी ठिक ९.००वा माजलगाव शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकानी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन धम्मरॅली स सुरुवात करण्यात आली व सांची बुद्ध विहार डॉ आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येते रॅलीचा समारोप करुन पुज्य भन्ते धम्मप्रिय थेरो चैत्यभूमी दादर मुंबई यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. तसेच धम्मप्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते त्यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड पुर्व चे पर्यटन सचिव के व्ही साळवे सर हे होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा माजलगाव चे तालुका अध्यक्ष डॉ भागवत साळवे हे होते भारतीय बौद्ध महासभा महिला जिल्हा संस्कार उपाध्यक्ष लिलाताई उजगरे,जिल्हा महिला संस्कार सचिव आशा ताई मोरे ,जिल्हा संस्कार





सचिव शामभाऊ वाघमारे,महिला जिल्हा संघटक शोभाताई भोजने, जिल्हा संघटक बी सी डोंगरे ,महिला तालुका अध्यक्ष मंदाताई साळवे,शेलापुरीच्या उपसरपंच शुशिलाताई घडसे यांच्या सह धम्म उपासक -उपासिका मोठ्या संख्येने उपस्तीत होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक भारतीय बौद्ध महासभा शहर अध्यक्ष एल आर मस्के यांनी केले प्रमुख मार्गदर्शक के व्ही साळवे सर यांनी अशोका विजयादशमी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची धम्मक्रांती गतीमान कशी करावी ह्या विषयी विविध मुद्या द्वारे मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वंदनाताई घनघाव यांनी केले तर हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ,नाथाजी घडसे ,किसन भदरगे,नितिन डोंगरे,गुलाब धाईजे मोहन काकडे, डी.पी.वाघमारे नाना, डी.एस.साळवे दादा ,दयानंद साळवे,भानुदास साळवे, राजेभाऊ साळवे समाधान साळवे,अमोल टाकणखार , बाबासाहेब घनघाव,शिवाजी कासारीकर,सह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.



# संतोषी माता मंदिर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत नवरात्र महोत्सवाची सांगता

बीड /प्रतिनिधी

पेठ बीड भागातील दक्षीणमुखी हनुमान टेकडी संस्थान, संतोषीमाता मंदीर येथे विजयादशमी (दसरा) निमित्ताने संतोषीमाता मंदीरा सभागृहात गुरुवार दि.०२ ऑक्टोंबर २०२५ रोजी प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये नवरात्र महोत्सवाची सांगता करण्यात आली.

यावेळी नगरसेवक अमर नाईकवाडे, मंगेश लोळगे, जवाहरलाल सारडा, सि.ए.गोपाल कासट, सुरज लाहोटी, भगिरथ चरखा, चांदमल मुंदडा, विकी कवठेकर, बालाप्रसाद चरखा, शिवाजी कुदंडे, पवन लाहोटी, बालाप्रसाद दोडे, धनंजय गोस्वामी, पवन सारंडा, गोविंद कासट, ड. बालाप्रसाद सारंडा, बालकिशन सिकची, अरुण ओझा, अनिल गुप्ता, डॉ राजेंद्र सारडा, काशिद, घोरड पत्रकार रिपोर्टर, मंगलबाई, महिला वर्ग, ,रंगार गल्ली मित्र मंडळ, पंचक्रोशीतील व्यापारी भक्तगण बहुसंख्येने उपस्थितीत मातेची महाआरती करण्यात आली.नवव्या माळेस पंकज भुतडा, मयुर कासट, काशिदजी, गिरिष सोहनी, रांदड, अमर डागा, इंजि. सारंडा, बाळकिशन सिकची, गोविंद कासट, विष्णुदास बियाणी, बालाप्रसाद चरखा, शर्मा महाराज, सिंधी भाभी, सारिका बियाणी, सारिका शर्मा, करवा, पांडे यांच्यासह पंचक्रोशीतील भक्तगण यांच्या हस्ते संतोषी मातेची महाआरती संपन्न झाली.नवरात्र महोत्सवात अष्टमी होम हवन विधीचे मुख्य यजमान श्री व सौ विष्णुदास बियाणी, श्री व सो मुख्याध्यापक सूनील लाहोटी, श्री व सौ अमर कासट, श्री व सौ कृष्णा रामचंद्र सारडा यांनी यजमानपद स्विकारले. संतोषीमाता मंदीरातील धार्मिक विधींसह नियमितपणे आरतीचे पौरोहित्य चिंटू पांडेजी यांनी केले.महिला मंडळाच्या वतीने रामचरित मानस (नवान्न पारायण), सुंदरकांड पारायण,

# खो-खो मैदानावर राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या मुलींचा डंका



बीड /प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद बीड आणि जिल्हा खो-खो असोसिएशन बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेत राजर्षी शाहू कन्या विद्यालय, बीड या शाळेच्या १४ वर्षाखालील आणि १७ वर्षाखालील मुलींच्या संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावले आहे.

या दोन्ही संघांची गेवराई येथे होणार्या जिल्हास्तरीय शालेय खो-खो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

१४ वर्षाखालील मुलींच्या संघाने अंतिम सामन्यात जिल्हा परिषद शाळा, हिंगणी संघाचा १ डाव व ५ गुणांनी पराभव केला. तर १७ वर्षाखालील मुलींच्या संघाने नाळवंडी हायस्कूल संघाचा ६ गुणांनी पराभव करून विजेतेपद मिळवले. या स्पर्धेत विजयश्री मिळवलेल्या दोन्ही संघांना संस्थेचे सचिव तथा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. जे.पी. शेळके, प्रशिक्षक तुकाराम करांडे आणि विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख व्ही.डी. मातकर यांचे नियमित मार्गदर्शन लाभले.

बोरगे नंदिनी(कॅप्टन), खापडे भक्ती, येवले कीर्ती, कुटे सपना, काकडे श्रद्धा, डाके सिद्धी, लांडे अजली, देवगुडे आदिती, शिंगण सानिका, महाकले पूनम, गर्वधर अनुजा, केसकर भक्ती, बनसोडे आरुषी, घायाळ सविता, सुरवसे अनन्या.

१७ वर्षाखालील संघ:

चोले अक्षरा(कॅप्टन), गाडे अक्षरा, भिल्लारे शिवानी, शेलार अक्षरा, थापडे समृद्धी, शिंदे वैष्णवी, येवले समीक्षा, सानप रोहिणी, उबाळे शिवानी, आखाडे श्रद्धा, पवार अक्षरा, पवार सुप्रिया, मुळे प्रतीक्षा, मस्कर आरती, कोल्हे अक्षरा.या दोन्ही संघांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील, संस्थेचे सचिव प्रा. जे.पी. शेळके, संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक मंडळ ,मुख्याध्यापिका श्रीमती एस.डी. कदम, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री. आर.टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर.डी. लोखंडे, तसेच सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशामुळे विद्यार्थिनींच्या आत्मविश्वासात भर पडली असून, भविष्यात आणखी यश संपादन करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

# डाक विभागात ढाई आखर पत्र लेखन स्पर्धेसाठी सहभागी होण्याचे आवाहन

बीड /प्रतिनिधी

भारतीय डाक विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावर पत्र लेखन स्पर्धा ढाई आखर बीड डाक विभागात आयोजित केली आहे. हि स्पर्धा दर वर्षी आयोजित केली जाते, तसेच गेल्या वर्षी बीड विभागातून दादासाहेब सादोलकर यांनी राष्ट्रीय स्तरावर प्रथम क्रमांक पुरस्कार मिळविला होता.

तर या वर्षी २०२५ मध्ये पत्राचा विषय लेटर टू माय रोल मॉडेल असा असून स्पर्धकाने या विषयावर लिहावयाचे आहे. पत्र कोणत्याही भाषेमधून लिहिता येते. ही पत्र लेखन स्पर्धा वय वर्षे १८ पर्यंत एक गट व वय वर्षे १८ च्या वर दुसरा गट अशा दोन गटात विभागलेली आहे. स्पर्धकानी दि. ०१ जानेवारी २०२५ रोजी माझे वय १८ पेक्षा कमी/जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख करावा.तसेच आपले नाव पत्ता व वयाचा उल्लेख असावा. पत्र मुख्य पोस्टमास्तर जनरल,महाराष्ट्र सर्कल,मुंबई जी पी ओ, मुंबई-४००००१ यांच्या नावाने लिहून डाकघरामार्फत लावलेल्या विशेष टपाल पेटीत टाकावयाचे आहे. पाकिटातून पत्र पाठवण्याची शब्द मर्यादा १००० व अंतर्देशीय पत्रासाठी ५०० शब्दाची आहे. पत्र पाठविण्याची शेवटची तारीख ०८ डिसेंबर २०२५ असून यानंतर पाठवलेल्या पत्राचा पत्र लेखन स्पर्धेमध्ये समावेश करण्यात येणार नाही.

राज्य स्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रासाठी अनुक्रमे रु.२५०००/-, रु.१००००/- व रु.५०००/- राज्यस्तरावर निवडलेल्या प्रत्येक गटातून निवडलेल्या तीन उत्कृष्ट पत्राला राष्ट्रीय स्तरावर पाठवण्यात येईल व राष्ट्रीय स्तरावर निवडलेल्या उत्कृष्ट पत्रासाठी अनुक्रमे रु.५००००/-, रु.२५०००/-, रु. १००००/- चे पारितोषक देण्यात येईल.तरी जास्तीत जास्त संख्येने जनतेने आपला सहभाग नोंद्वावा असे आवाहन डाक विभागाचे डाक अधिक्षक डी आर शिवणीकर यांनी केले आहे.आधिक माहितीसाठी डाक कार्यालयाचा दुरध्वनी क्र.०२४४२-२२७०३५ यावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

बीड /प्रतिनिधी

सन २०२५-२६ अंतर्गत गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्याचे अवाहन राष्ट्रीय खाद्य तेल अभियान तेलबिया योजने अंतर्गत सन २०२३-२४ या वर्षासाठी २५० मे.टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर बाबीचा लाभ घेण्यासाठी पात्रता :- जिल्ह्यातील सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (त्रझजड) आणि सहकारी संस्था.अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे सदर बाब बँक कर्जाशी निगडीत असून इच्छुक अर्जदार संस्थेने केंद्र शासनाच्या डच-ढध प्रकल्प /वखार महामंडळ यांचे मार्गदर्शक सुचनांनुसार अर्जदारांनी प्रथम बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर बँकने कर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज करण्यास पात्र राहील. लाभार्थ्यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह अर्ज जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,कार्यालयास सादर करावा. ज्या कार्यक्षेत्रात सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (त्रझजड) आणि सहकारी संस्था.आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनी चे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनी चे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनी चे कमीटीचे ठराव,सभासदांची यादी मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनी चे इरश्ररपलश डहशशीं/-ींवळीं ठळ्ीीं, ज्या जागेवर गोदाम उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा.अर्ज करण्याचा अंतिम दिनांक:- दि.०९ ऑक्टोबर २०२५ अखेर आपले अर्ज जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. अंमलबजावणी प्रक्रिया निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छाननी नंतर पुर्वसमती देण्यात येईल. पूर्व संमती भेटल्यानंतर गोदाम बांधकामास कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अनुदान रक्कम :- गोदाम बांधकामाची क्षमता २५० मे. टन असुन अनुदान जास्तीत जास्त रु १२.५० लाख किंवा गोदाम बांधकामास आलेल्या खर्चाच्या ५० टक्के जे कमी असेल ते देय आहे. गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषी माल साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. या बाबत रु.१०० च्या स्टंप पेपरवर नोटराईज्ड हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत जिल्ह्यातील सरकारी/खाजगी उद्योग, शेतकरी उत्पादक संस्था /कंपनी (त्रझजड) आणि सहकारी संस्था यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड येथे गोदाम बांधकामासाठी अर्ज सादर करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी एस.एम.साळवे यांनी केले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकांचे ऑक्टोबर महिन्याचे वेतन वाढीव टप्प्यानुसार करण्यासाठी लागणाऱ्या निधीची मागणी करा

## बीड जिल्हा विना अनुदानित शाळा कृती समितीचे वेतन अधीक्षकांना निवेदन

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील कार्यरत असणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना अनुदानाचा

२०% वाढीव टप्पा शासनाने मंजूर केला आहे. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ पासून या शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्यानुसार वेतन देण्याचे शासनाने जाहीर केले. परंतु अद्यापही २० टक्के वाढीव टप्प्यानुसार या शिक्षकांच्या खात्यात वेतनाची रक्कम जमा झाली नाही. किमान दिवाळी सणाच्या निमित्ताने या सर्व शिक्षकांचे वेतन २० टक्के वाढीव टप्प्यानुसार व्हावे, त्यासाठी लागणाऱ्या निधीची आपण मागणी करावी या मागणीचे निवेदन बीड जिल्हा विना अनुदानित शाळा



कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी वेतन अधीक्षक राजेश खटावकर यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

यावेळी पदाधिकाऱ्यांशी बोलताना खटावकर यांनी आपली मागणी वरिष्ठ कार्यालयाकडे कळवली जाईल व वाढीव टप्प्यासाठी लागणारा आवश्यक निधीची मागणी करून अंशतः अनुदानित शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करणार असल्याचे पदाधिका-यांना आश्वसित केले.

या निवेदनावर विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा अध्यक्ष वैजनाथ चाटे, छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, महिला आघाडीच्या मराठवाडा सचिव श्रीमती मुक्ता मोटे मॅडम, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे, प्राचार्य तुकाराम खाडे, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, बीड जिल्हा कार्याध्यक्ष प्रताप पवार, जिल्हा उपाध्यक्ष रामदास जामकर, अरविंद सौंदलकर, जिल्हा सचिव शेख सर, श्री देशमुख, बीड तालुका अध्यक्ष भागवत यादव, बाळासाहेब नागरगोजे, सय्यद रिजवान, नितीन बिनवडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# माजलगावातील पूरग्रस्तांसाठी सामाजिक बांधिलकीतून मदतीचा हात

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटनेचा पुढाकार

माजलगाव (प्रतिनिधी) : महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कर्मचारी संघटना मुंबई यांच्या माध्यमातून तालुक्यातील सुरूमगाव, शु. निमगाव, मोगरा, डाके पिंप्री, खतगव्हाण, सांडस चिंचोली येथील पूरग्रस्तांसाठी अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू व शालेय साहित्य किटचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपली.

महाराष्ट्र वस्तू व सेवा कर आयुक्त, उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले, तहसीलदार संतोष रुईकर यांच्या प्रेरणेतून वस्तू व सेवा कर संघटनेचे अध्यक्ष संजय मंडले, सरचिटणीस अजित भोसले यांच्या संकल्पनेतून व मास्टर ट्रेनर आपत्ती व्यवस्थापन डॉ.




राजकुमार राठोड, सहशिक्षक जालिंदर साबळे, सहशिक्षक ज्ञानेश्वर पवार यांच्या सहकार्याने सामाजिक बांधिलकीतून सात लक्ष रुपये किंमतीच्या सुमारे ४०० अन्नधान्य, जीवनोपयोगी वस्तू व शालेय साहित्य कीटचे वाटप पूरग्रस्त कुटुंबांना करण्यात आले. पूरग्रस्त कुटुंबीयापर्यंत मदत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर विभागातील अधिकारी व कर्मचारी सुभाष लवटे, विजय मोरे, अनिल चव्हाण, प्रवीण बहिर, विशाल वाघ, पांडुरंग गर्जे, प्रमोद कामकर, रामेश्वर आहेर, अरुण गायकवाड, बळीराज, दशरथ जानकर, दत्ता बर्वेकर, हरी गोल्हार, कृष्णा अंभोरे, मयूर खामकर, दत्ता माने,निखिल पवार, सचिन जाधव, विजय सोनवणे, भावेश सोनवणे इत्यादी अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. पूरग्रस्त कुटुंबीयांनी तसेच समस्त माजलगावकरांनी सर्वांचे आभार मानले.

# मनुरवाडी गावच्या ग्रामसेवकास निलंबीत करा

## गटविकास अधिका-यांकडे मागणी

माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यातील मनुरवाडी गावचे ग्रामसेवक यांनी गावातील तरूणांना शिवीगाळ केल्याप्रकरणी ग्रामसेवकावर कडक कारवाई करून निलंबन करा अशी मागणी गटविकास अधिकारी यांचेकडे ग्रामस्थांच्या वतीने निवेदनाव्दारे करण्यात आली.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दि. ५ ऑक्टोबर रविवारी रात्री १२ वाजता गावातील मंदिरासमोर येत ग्रामसेवकाने रात्री बारा वाजता अतिषबाजी केली. याबाबत गावातील नागरिकांनी, तरूणांनी विचारणा केली असता मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार या तरुणांसह ग्रामस्थांना



शिवीगाळ केली. त्यामुळे अशा हुल्लडबाज ग्रामसेवकावर कडक कारवाई करा व पदावरून निलंबीत करावे अशी मागणी ग्रामस्थानी गटविकास अधिका-यांकडे निवेदनाव्दारे केली असुन निवेदनावर मुकुंद पवार, गणेश जाधव, योगेश पवार, ऋषिकेश शिंदे, कैलास शिंदे, विशाल पवार, नितीन थोरात, शहाजी पवार, गणेश थोरात, अमोल पवार, भिम थोरात, अतूल पवार, बापू श्रिखंडे, महेश शिंदे योगेश शिंदे, अनंता जगताप, भागवत हरकाळ, सुरेश ढगे यांच्या स्वाक्ष-या आहेत.

# शिस्त- लयबद्धतेचा संगम, संघाचे अंबाजोगाईत ऐतिहासिक पथसंचलन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

शताब्दी वर्षात प्रवेश करत असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी रविवारी सायंकाळी ऐतिहासिक पथसंचलन काढले. यात स्वयंसेवकांच्या शिस्त व लयबद्धतेचे अंबाजोगाई करांना दर्शन झाले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाली. या पार्श्वभूमीवर रविवारी अंबाजोगाईत पथसंचलन निघाले. संस्कार-शिस्त आणि राष्ट्रभक्तीचे बीज, शिस्तबद्ध संचलनात दिसलेली संस्कारांची झलक अशा अद्वितीय संगमाचा प्रत्यय अंबाजोगाई करांनी अनुभवला. संस्कारांतून नागरिक, नागरिकांतून राष्ट्र असे विचार पाहून नागरिकदेखील त्याच ऊर्जेने प्रतिसाद देताना दिसले. शंकर महाराज वंजारी वसतिगृहाच्या मैदानावरून निघालेले संचलन सावरकर चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुरुवरपेठ, मंडीबाजार, पाटील चौक, कुतर विहीर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे परत शंकर महाराज वंजारी वसतिगृहाच्या मैदानावर पोहोंचली. याठिकाणी शस्त्रपूजन व प्रमुख मार्गदर्शन झाले. व्यासपीठावर .प्रमुख मार्गदर्शक म्हणून देवगिरीप्रांत सदभाव प्रमुख ड आशिष जाधव, मुकुंदराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प.किसन महाराज पवार, प.पू. शंभूलिंग शिवाचार्य महाराज, जिल्हा संघचालक जयप्रकाश तोष्णीवाल, जिल्हा सहकार्यवाह बिपीन क्षीरसागर,शहर संघचालक निवृत्ती



दराडे,उपस्थित होते.या संचलनात स्वयंसेवक व नागरिक उपस्थित होते.

संघाची शाखा हे व्यक्ती निर्माणाचे केंद्र: ड आशिष जाधव

या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमांत देवगिरीप्रांत सदभाव प्रमुख ड आशिष जाधव म्हणाले की संघाची शाखा हे व्यक्तीनिर्माणाचे केंद्र आहे. राष्ट्र पुन्हा पारतंत्र्यात जाऊ नये.यासाठी एकजूट महत्वाची असल्याचे त्यांनी सांगितले. अंबाजोगाईत संघ स्थापनेला ९० वर्षे पूर्ण झाली. यासाठी अनेक स्वयंसेवकांचे मौलिक योगदान असल्याचे त्यांनी सांगितले. किसन महाराज पवार यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

# शिरूर पोलिसांची अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई



बीड /प्रतिनिधी

शिरूर पोलिसांनी ६ ऑक्टेंबर २०२५ रोजी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तराडगव्हाण पुलाजवळ सापळा रचून अवैध वाळू चोरी करणाऱ्यांवर कारवाई केली.

या कारवाईत आरोपी नामे सचिन रामेश्वर जगदाळे, गोविंद सुभाष पवार

( रा. तराडगव्हाण, ता. शिरूर (का.)

यांनी अवैधरित्या वाळू चोरी करून वाहतूक करत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस पथकाने तत्काळ घटनास्थळी छापा टाकला.सदर आरोपींविरुद्ध शिरूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाईत ट्रॅक्टर, किंमत अंदाजे रु. ८,००,०००/-) आणि वाळू (किंमत रु. ६,०००/-) असा एकूण रु. ८,०६,०००/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोलीस उपनिरीक्षक धनंजय कुलकर्णी, तसेच अंमलदार तुषार गायकवाड व पो. शि. सुनील बहिरवाल यांच्या पथकाने केली आहे.

अवैध वाळू वाहतुकीविरोधात बीड जिल्हा पोलीस दलाकडून सातत्याने कठोर पावले उचलली जात असून, अशा प्रकारच्या अवैध धंद्यात सहभागी असणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे शिरूर पोलीस ठाणे यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

# मेंगडेवाडी ग्रामस्थांचा रस्त्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको

## तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास थांबविण्याची मागणी - डॉ. गणेश ढवळे

पाटोदा , प्रतिनिधी - पाटोदा तालुक्यातील वाघिरा ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या सुमारे ९०० लोकसंख्या असलेल्या मेंगडेवाडी गावाला स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत डांबरी रस्ता मिळालेला नाही. त्यामुळे ग्रामस्थांना दरवर्षी पावसाळ्यात मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे.

रस्ता नसल्याने ग्रामस्थांना दूध-दुभते विक्रीसाठी, बाजारहाट, दवाखाना तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी तलावाच्या सांडव्यातून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. पालकांना दररोज लेकरांना शाळेत पाठवताना जीव मुठीत धरावा लागतो.

ग्रामस्थांनी गेल्या अनेक वर्षांपासून लोकप्रतिनिधींपासून मंत्र्यांपर्यंत रस्त्याची मागणी केली. निवेदने, आंदोलन, आणि पाठपुरावा




करूनही फक्त आश्वासनांचीच बरसात झाली, प्रत्यक्षात काम काहीच झाले नाही.त्यामुळे ग्रामस्थांचा संताप उसळला असून, अखेर आज सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.आज दिनांक ०६ ऑक्टोबर, सोमवार रोजी सकाळी अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा-पाटोदा दरम्यान वाघिरा फाटा येथे हे आंदोलन झाले. आंदोलनादरम्यान गावकऱ्यांनी मोठ्या घोषणाबाजीसह प्रशासनाला धारेवर धरले.

यावेळी विविध मान्यवरांनी भाषण करताना प्रशासनाने तातडीने मेंगडेवाडी ते वाघिरा या रस्त्याचे बांधकाम हाती घ्यावे, अन्यथा पुढील काळात तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला. आंदोलनानंतर पाटोदा पोलिस स्टेशनचे सपोनी तागड , लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार राख,बडे, पोलिस अंमलदार मुरकुटे,पोह.जायभाये, मिसाळ, मंडळ अधिकारी, तलाठी अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

या आंदोलनात विष्णु बांगर, भगवान शिंदे, रामेश्वर शिंदे,मल्हारी आरगुडे, दिगांबर बावणे,केशव रांजवण, राजेभाऊ कदम, पोपट बांगर, हनुमान शिंदे, डिगांबर माने,जगन्नाथ बोबडे, कृष्णा जगदाळे, श्रीहरी आरगुडे, दिलीप जाधव, यश बांगर , गणेश जगताप, शेषेराव बांगर, बालाजी नागरगोजे,भरत रांजवण, लक्ष्मण शिंदे, शिवाजी बोंबाळे,सागर डोरले आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# देगलूरमध्ये बतकम्मा सणाचा जल्लोष - माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या पुढाकाराने रंगला पारंपरिक उत्सव

देगलूर /प्रतिनिधी

देगलूर तेलगू भाषिक समाजाचा सांस्कृतिक आणि पारंपरिक असा बतकम्मा सण देगलूर शहरात शनिवारी, दि. ४ ऑक्टोबर रोजी मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक वातावरणात साजरा करण्यात आला. माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांच्या पुढाकारामुळे काही वर्षांपूर्वी हरवू पाहणारा हा सण पुन्हा नवचैतन्याने शहरात फुलला आहे.

सार्वजनिक बतकम्मा महोत्सवाच्या निमित्ताने शहरातील माता-भगिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. महिलांसाठी खास बतकम्मा सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नैसर्गिक फुलांच्या माध्यमातून साकारलेल्या रंगीबेरंगी बतकम्मांनी सार्वजनिक विसर्जन घाट परिसर सुगंधित झाला होता. सौंदर्य, सृजनशीलता आणि पारंपरिकतेच्या निकषांवर परीक्षकांनी सजावटींचे मूल्यमापन केले. विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची सोय करण्यात आली होती, तर निकाल निकाल



दिवाळीला जाहीर होणार आहे..

या प्रसंगी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या प्रतिनिधी म्हणून मा. सौ. सोनीयाताई रवींद्र चव्हाण उपस्थित राहिल्या. आयोजक मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. पूजन, भक्तिगीते, महिलांसाठीच्या स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांनी घाट परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले.

संपूर्ण उत्सव शांततेत आणि सुरळीत पार पडावा यासाठी पोलिस प्रशासनाकडून विशेष सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. पोलिस निरीक्षक मारुती मुंडे यांच्या नेतृत्वाखाली व पोलीस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नगरपरिषद मुख्याधिकारी, स्वच्छता विभाग, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यांनी संयोजनात्मक कार्य केले. विसर्जन कार्यात भोई बांधवांचे विशेष सहकार्य लाभले.

उत्सवाच्या यशस्वी आयोजनानंतर माजी नगराध्यक्ष मोगलाजी ईरन्ना शिरशेटवार यांनी सांगितले की, देगलूर हे बहुभाषिक आणि बहुसांस्कृतिक शहर आहे. बतकम्मा सण हा त्या एकतेचा आणि परंपरेचा सुंदर आविष्कार आहे. या सणाला मिळालेला प्रचंड प्रतिसाद देगलूरकरांच्या संस्कृतीप्रेमाचे प्रतिक आहे.

या सार्वजनिक बतकम्मा महोत्सवात शहरातील पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, विविध पक्ष- संघटनांचे नेते, नगरसेवक, महिला वर्ग तसेच सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. सर्वांनी एकत्रितपणे दिलेल्या सहकार्यामुळे हा पारंपरिक उत्सव अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला.

उत्सवाच्या शेवटी माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी, कार्यकर्ते, नागरिक, मंडळाचे पदाधिकारी व सर्व देगलूरकरांचे आभार मानत सांगितले की, या उत्सवाच्या निमित्ताने आपण आपली लोकसंस्कृती जपली आहे. ही परंपरा अशीच पुढे वृद्धिंगत होवो, हीच अपेक्षा.

# गेवराईत रंगला कृष्ण जन्माचा सोहळा

शिवाजीराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित भागवत कथेस उस्फूर्त प्रतिसाद

गेवराई (प्रतिनिधी) माजी मंत्री शिवाजीराव (दादा)पंडित यांच्या ८८ व्या अभिष्टचिंतन सोहळा निमित्त गेवराई शहरांमध्ये आयोजित केलेल्या भागवत कथेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून कथा प्रवक्ते समाधान महाराज शर्मा यांनी आपल्या मधुर वाणीतून कथा सादर करून उपस्थितांची मने जिंकली आहेत. भागवत कथे बरोबरच सायंकाळच्या सत्रामध्ये संगीत भजन आणि रात्री कीर्तनालाही भाविक भक्त उत्स्फूर्त प्रतिसाद देत असून शिवाजीराव (दादा) पंडित अभिष्टचिंतन सोहळ्याचे पदाधिकारी कीर्तन महोत्सव यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. आज शिवनगरीत कृष्ण जन्माचा सोहळा रंगला. उपस्थित भाविक भक्तांनी यावेळी आनंद साजरा केला.

गेवराई शहरातील र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर उभारलेल्या शिवनगरीत भागवत कथा सुरू असून भागवताचार्य समाधान महाराज शर्मा आपल्या मधूर वाणीतून भगवत कथा कथन करत आहेत. कथा श्रवण करण्यासाठी महिला व पुरुष भाविकभक्त प्रचंड गर्दी करत आहेत. सोहळा समितीचे पदाधिकारी पदाधिकारी अभिष्टचिंतन सोहळा यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहेत. किर्तन महोत्सवाला माजी मंत्री




शिवाजीराव पंडित, जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, शिवशारदा मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग पंडित, आ. विजयसिंह पंडित यांची उपस्थिती लाभत आहे.रविवारी सायंकाळच्या सत्रात सुप्रसिद राष्ट्रीय गायक पंडीत रमाकांतजी गायकवाड यांचे शास्त्रीय उपशास्त्रीय अभंग गायन तर रात्री ह.भ.प.कीर्तनकेसरी सागर महाराज बोराटे यांचे सुश्राव्य हरिकीर्तन झाले. यावेळी अभिष्टचिंतन सोहळा समितीचे पदाधिकारी, भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाकडून तीन कोटी पन्नास लाख रुपयांचे विमा कवच ?

## पत्रकारांना लॅपटॉप किट वाटप आणि पूरग्रस्तांना आधार देणारा ऐतिहासिक अधिवेशन सोहळा जळगावात उत्साहात संपन्न









जळगाव /प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित उत्तर महाराष्ट्र विभागीय पत्रकार अधिवेशनात पूरग्रस्त ३५० शेतकऱ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये प्रमाणे एकूण तीन कोटी पन्नास लाख रुपयांचे विमा कवच प्रदान करण्यात आले.

या अधिवेशनात पत्रकार संरक्षण कायदा, पत्रकारांवरील हल्ले, समाजसेवेत पत्रकारांची भूमिका, आपत्तीग्रस्तांना दिला जाणारा आधार आणि डिजिटल पत्रकारितेतील बदल या विषयांवर सखोल चर्चा झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार किशोर आप्पा पाटील, माजी आमदार दिलीप वाघ, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा, मराठवाडा विभागीय संपर्कप्रमुख कुंडलिक वाळेकर, काँग्रेस नेते सचिन सोमवंशी, ज्येष्ठ पत्रकार किसनराव जोरवेकर, नरेंद्र जामदार, उत्तर महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष जितेंद्र सिंह राजपूत आदी मान्यवर उपस्थित होते. या अधिवेशनाला राज्यभरातील विविध वृत्तपत्र संपादक, पत्रकार, छायाचित्रकार, न्यूज पोर्टल प्रतिनिधी, इलेक्ट्रॉनिक मीडिया पत्रकार आणि समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांसाठी पत्रकार संघाचा हातभार, ३.५० कोटींचे विमा कवच!

महाराष्ट्र राज्यातील जलप्रलयाने उत्तर महाराष्ट्रासह अनेक भागातील शेतकरी उद्ध्वस्त झाले. जनावरांचे बळी गेले, शेतजमिनी वाहून गेल्या, तर पिकांचे मोठे नुकसान झाले. या परिस्थितीत महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने सामाजिक बांधिलकी जपत ३५० शेतकऱ्यांना प्रत्येकी एक लाख रुपये विमा कवच देऊन मोठा दिलासा दिला.या लाभार्थ्यांमध्ये कैलास कोंडू परदेशी, गोकुळ प्रताप परदेशी, सुपडू हरचंद पाटील, शंकर प्रताप परदेशी, शंकर बाजीराव पवार, यशोदाबाई सुपडू पाटील, ताराबाई गोकुळ परदेशी, गजानन सुपडू लाधे, बालचंद गोकुळ राजपूत, कविता बालचंद राजपूत यांसारख्या शेतकऱ्यांचा समावेश होता.

यावेळी उपस्थित पत्रकारांनी या उपक्रमाचे स्वागत केले आणि संघाच्या समाजहितासाठी केलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.पत्रकार संघाचा असा उपक्रम फक्त पत्रकारांना सुसज्ज करतो असे नाही, तर त्यातून समाजातील विविध समस्यांवर तत्परतेने लक्ष देण्याची क्षमता निर्माण होते, असे देखील सांगितले गेले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदेश कार्यकारिणी सदस्य अभयार मिर्झा, विभागीय सचिव राकेश सुतार, इलेक्ट्रॉनिक मीडिया अध्यक्ष समाधान मैराळे, प्रसिद्धी प्रमुख विनोद कोळी, गणेश रावल, विजय गाडे, सागर शेलार, महेंद्र सूर्यवंशी, सुनील भोळे, स्वप्निल कुमावत, छोटू सोनवणे, सुनील कोळी, अन्वर शेख यांनी अथक परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आयाज मोसिन यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रदेश उपाध्यक्ष किशोर रायसाकडा यांनी मानले. शेवटी स्नेहभोजनाने अधिवेशनाची सांगता झाली.

### या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा केला सन्मान

या अधिवेशनात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना 'राज्य पत्रकार संघ गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. यामध्ये शारदाताई भागवत पाटील - आदर्श सरपंच,सुमित किशोर आप्पा पाटील - युवा नेतृत्व,सुषमाताई पाटील - आदर्श समाजसेविका, गजानन गवळी - आदर्श उद्योजक, पुरुषोत्तम चौधरी - आदर्श सरपंच, शितल सोमवंशी - आदर्श उद्योजक,किसनराव जोरवेकर - जीवनगौरव पुरस्कार,आबाजी पाटील - उद्योजक पुरस्कार, डॉ. किशोर पाटील - देवदूत पुरस्कार, कु. रितिका बडगुजर - महाराष्ट्र सुंदरी, राजाराम सूर्यवंशी - आदर्श शेतकरी, डॉ. राहुल झेरवाल - देवदूत पुरस्कार, प्रकाश जगताप - जीवनगौरव पुरस्कार, गोविंदा शेलार - आदर्श समाजसेवक, पद्मसिंह पाटील - समाजभूषण पुरस्कार, शेख अबुलेस - उत्कृष्ट उद्योजक, आशाबाई तावडे - आदर्श सरपंच, राजेश सोनवणे - आदर्श समाजसेवक यांना सन्मानित करण्यात आले.

### पत्रकारांना लॅपटॉप किट वितरण - तंत्रज्ञानासोबत पुढे जाण्याचा संकल्प - प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने कार्यरत पत्रकारांना आधुनिक तंत्रज्ञानासह सुसज्ज ठेवण्यासाठी लॅपटॉप किटचे वितरण करण्यात आले. हा उपक्रम संघाच्या समाजसेवेच्या व्यापक कार्याचा एक भाग असून पत्रकारांना त्यांच्या कामकाजात अधिक कार्यक्षम व सक्षम बनविण्यासाठी राबवण्यात आला आहे.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ समाज हितासाठी कार्य करतो - डॉ. विश्वासराव आरोटे

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी संघाच्या राज्य अधिवेशनात समाजसेवेचा व पत्रकारांच्या हक्कांचा ठाम मुद्दा मांडत भावनिक भाषण केले. पत्रकार संघाच्या कार्याची दिशा आणि तत्वज्ञान यावर सविस्तर प्रकाश टाकला. पत्रकार संघाचा उद्देश प्रसिद्धी मिळवणे नव्हे, तर समाजातील वंचित घटकांपर्यंत न्याय पोहोचवणे आहे. पत्रकार संघाने नुकताच पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी तीन कोटींहून अधिक रुपयांचे विमा कवच वाटप करून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे, असे ते म्हणाले.

### महायुती सरकारने पत्रकारांचा अंत पाहू नये - डॉ. विश्वासराव आरोटे
### राज्यातील जलप्रलय हा पाच वर्ष विकासाला मागे टाकणारा - आमदार किशोर पाटील



आष्टी येथील ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उपअभियंता सुनिल कुलकर्णी यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार करताना रेणुकाई कंन्ट्रक्शन कंपनीचे मालक इंजि. प्रविण वारे, जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, राज्य शासनाचा आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड दिसत आहेत.

# ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा बंधाऱ्यांचे रुपांतरण कामास प्रशासकीय मान्यता

## आ. सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नांना यश
## शेतकऱ्यांसाठी नवसंजीवनी; सिंचन व्यवस्थेत नवा टप्पा

आष्टी - (प्रतिनिधी) शिरूर (कासार) तालुक्यातील जलसंपदा विकासासाठीचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा पार पडला आहे. दीर्घकाळ प्रलंबित असलेले ब्रम्हनाथ येळंब व निमगाव मायंबा को. प. बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतरण काम अखेर आ. सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण व भगीरथ प्रयत्नांना यश येत महाराष्ट्र शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.



या मान्यतेनंतर तालुक्यातील जलसंपदा विकासाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले गेले असून, शेतकऱ्यांसाठी ही जलसिंचनातील नवसंजीवनी ठरणार आहे. ब्रम्हनाथ येळंब बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी रु. १७,३०,१२,६०६ (सतरा कोटी तीस लाख बारा हजार सहाशे सहा रुपये) इतका निधी मंजूर झाला आहे, तर निमगाव मायंबा बंधाऱ्याच्या रुपांतरणासाठी रु. २२,०८,९५,१५६/- (बावीस कोटी आठ लाख पंच्याण्णव हजार एकशे छप्पन्न रुपये) एवढ्या खर्चाच्या प्रस्तावास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. या निर्णयानंतर लवकरच या दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष कामांना सुरूवात होणार आहे. प्रकल्पांतर्गत बंधाऱ्यांचे मजबुतीकरण, गेट्सची दुरुस्ती, नवीन बॅरेज बांधकाम, जलसाठा क्षमता वाढविणे आणि जलप्रवाह नियंत्रण यांसारखी महत्त्वाची कामे केली जाणार आहेत.

परिणामी परिसरातील शेकडो हेक्टर शेतीला थेट सिंचनाचा लाभ मिळून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या निर्णयामुळे शिरूर (कासार) परिसरातील जलसंपदा व्यवस्थापनात आमूलाग्र सुधारणा होईल. उन्हाळ्यातील पाण्याची टंचाई कमी होऊन पिकांचे उत्पादन वाढेल, भूजल पातळी स्थिर राहील, तसेच जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता सुधारेल. स्थानिक शेतकरी, ग्रामपंचायत प्रतिनिधी आणि नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, हा निर्णय आमच्या शेतशिवाराच्या पुनरुत्थानाचा आणि जलसमृद्धीचा पाया ठरणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, तसेच भाजपा - महायुती सरकार आणि आ. सुरेश धस यांचे शेतकरी व ग्रामस्थांकडून मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत. या प्रकल्पांच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर शिरूर (कासार) तालुक्याच्या कृषी विकासाला नवी दिशा आणि बळकटी मिळेल,

# केज कळंब रोडवर पिकअप आणि कारची जोरदार धडक

केज/प्रतिनिधी

दि.६ आक्टोबर रोजी दुपारी २ वाजण्याच्या दरम्यान केज-कळंब रोडवरील साळेगाव-माळेगाव मोहरील बाबा दर्गा पुलावर पिकअप क्रमांक चक३८ ए२२३१ आणि कार यांच्यात भीषण अपघात झाला. या अपघातात तीन गंभीर जखमी झाल्याची शक्यता असून जखमींना तत्काळ केज उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.सदरील घटनेची माहिती मिळताच केज पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक स्वप्निल उनवणे व त्यांचे सहकारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव



घेतली.त्यांनी अपघात स्थळावरील दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. कारला नंबर प्लेट नसल्यामुळे वाहन क्रमांक दिसला नाही,अशीमाहिती पोलिसांनी दिली आहे.

अपघाताचे नेमके कारण समजू शकले नसून पुढील तपास केज पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली केज पोलिस करीत आहेत.

# तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यालयाचे नेत्रदिपक यश

माजलगाव /प्रतिनिधी : महाराष्ट्र शासन आयोजित संभाजीनगर विभागाअंतर्गत तालुकास्तरीय क्रिडा स्पर्धेत स्वामी विवेकानंद विद्यलयाने नेत्रदिपक यश मिळविले आहे. या विद्यालयाची विद्यार्थीनी राधा बाबासाहेब घाटुळ तिहेरी यश मिळविले आहे.



राधा ही १९ वर्षे वयोगटातून ४०० मिटर धावणे व गोळा फेक या स्पर्धेत तालुक्यात प्रथम आली आहे तर १९ वर्षे वयोगटातून ४ बाय ४०० मिटर रिले या स्पर्धेत वैष्णवी विष्णू लकडे, श्रेया अशोक पवार, सुजाता सदज मदने, स्नेहल शैलेंद्र राठोड व राधा नानासाहेब घाटुळ यांनी प्रथम क्रमांक मिळविला तसेच १७ वर्षे वयोगटातून २०० मिटर धावणे या स्पर्धेत पलुजा चव्हाण ही तृतीय आली आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे सोनाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मोहन जगताप, सचिव राहुल जगताप, मुख्याध्यापक लक्ष्मण जगताप, सुधाकर करांडे, एकनाथ चव्हाण, प्रशांत खडके, क्रिडा शिक्षक बालाजी तिडके, अरूण माने, श्रीकृष्ण थेटे, शिवदास बनसोडे, संदेश फुके, दिलिप घाटुळ, शरद राठोड, विनायक चौरे, वैभव सोळंके, शरद जावळे, संतोष ढेरे, लक्ष्मी अहंकारे, हेमलता भोसले, मोहिनी जाधव, प्रल्हाद चाळक, पांडुरंग कवडे यांनी अभिनंदन केले आहे.

# संविधान फाउंडेशनकडून दोनशे संविधानाच्या प्रति मोफत वाटप

## बीड जिल्ह्यातील सर्व कार्यालयात दिले संविधान



बीड /प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला लोकशाही प्रेरित संविधान दिले. त्या संविधानाचे जतन आणि संरक्षण करणे आपले कर्तव्य असल्याने संविधान फाउंडेशनकडून बीड शहरातील सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालयात संविधान भेट देत चक्क दोनशे संविधानाच्या प्रति मोफत वाटप करण्यात आले.

वंचित उपेक्षित घटकातील नागरिकांना संविधानाचे महत्व आणि संविधान ज्ञात असणे गरजेचे असल्याने प्रत्येक कार्यालयात संविधान ग्रंथ वाटप करण्यात आला. काही लोकांना कायद्याचे ज्ञान नसल्याने अनेकांकडून त्याचे शोषण केले जाते. हे शोषण न होण्याच्या हेतूने तसेच अन्यायाविरुद्ध, शोषणाविरुद्ध लढण्यासाठी आपले हक्क आणि अधिकारासाठी संजीवनी देणारा एक आणि एकमेव असा राष्ट्रीय ग्रंथ म्हणजेच आपलं हक्काच संविधान प्रत्येक घरात पोचलं पाहिजे या हेतूने संविधान फाउंडेशनच्या श्रीमती जयवंताबाई पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेत दोनशे संविधानाच्या प्रति मोफत वाटत करण्यात आल्या. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना संविधान देऊन उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी फाउंडेशन अध्यक्षा सुनिता पाटील यांच्यासह श्रीपाल ससाणे, बापू निकाळजे आदीची प्रमुख उपस्थिती होती.

# आदित्य दादा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प केला पूर्ण

केज/प्रतिनिधी

माऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये केज नगरीचे माजी नगराध्यक्ष,कॉंग्रेस कमिटी चे प्रदेश सरचिटणीस,तथा माऊली विद्यापीठ केजचे सचिव श्री.आदित्य दादा पाटील यांच्या ३९ व्या वाढदिवसानिमित्तमाऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुल परिसरात आज ५३९ वृक्षारोपणाचा संकल्प विविध विद्या शाखा प्रमुखांच्या उपस्थित पूर्ण झाला.



माऊली विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे यांच्या नियोजनातून विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात आले.वृक्षारोपण उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक धनंजय खोसे,सरस्वती महा विद्यालयाचे प्राचार्य डॉ गौतम पाटील,भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार शिनगारे, रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे एकनाथ गोरे, सरस्वती कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका सविता घुले,आदर्श प्राथमिक शाळेचे विलास भिसे, सरस्वती प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नितीन रसाळ यांसह शिक्षक कर्मचाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले

यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्तेमाऊली विद्यापीठ शैक्षणिक संकुलामध्ये वृक्षारोपण करण्यात आले व प्रत्येक वृक्षाचे पालकत्व सर्वांनी घेतले.यावेळी डॉ.हनुमंत सौदागर बोलतानाम्हणाले की,सचिव आदित्य दादा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण संकुलात सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या.यावर्षी सर्वत्र ओला दुष्काळ असल्याने वाढदिवसा निमित्त केवळ समाज उपयोगी उपक्रम घ्यावेत अशा सूचना दिल्यानेच यावर्षी वृक्षारोपण

करण्यात आले.पुढे ते म्हणाले पर्यावरण हे संबंध मानव जातीसाठी समृद्ध असणे काळाची गरज आहे व भविष्याची ती मागणी आहे यासाठी आपण सर्वांनी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.या वृक्षारोपण कार्यक्रमास माऊली विद्यापीठ परिवारातील सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

# देगलूर नगरपरिषद नगराध्यक्ष पदाचे आरक्षण OBC महिलांसाठी जाहीर




देगलूर / प्रतिनिधी

**देगलूर नगरपरिषदेसाठी आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला असून नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जइउ (इतर मागासवर्गीय) महिलांसाठी जाहीर करण्यात आले आहे. या निर्णयानंतर राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.**

राज्य शासनाने नगरपरिषदांच्या आरक्षणाचा अंतिम आराखडा प्रसिद्ध केला असून त्यानुसार देगलूर नगरपरिषदेसाठी आरक्षण जइउ महिला वर्गासाठी निश्चित झाले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत महिला नेतृत्वाला संधी मिळणार असून स्थानिक पातळीवर अनेक दावेदारांचे राजकीय गणित बदलण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या निर्णयाचे स्वागत करत स्थानिक समाजघटकांनी महिला सक्षमीकरणासाठी हे पाऊल महत्त्वाचे असल्याचे सांगितले आहे. तर काही राजकीय नेत्यांनी आगामी निवडणुकीतील उमेदवार निवडीसाठी पक्षांमध्ये नवीन समीकरणे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.देगलूर शहरातील राजकीय वर्तुळ आता नव्या उत्सुकतेने या निवडणुकीकडे पाहत आहे.

# पदवीधारकांची शैक्षणिक फरपट थांबवण्यासाठी नाव नोंदणी करा- सज्जाद सय्यद



पाटोदा (प्रतिनिधी)

छत्रपती संभाजी नगर,(औरंगाबाद) विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या पुन्हा नव्याने तयार होणार आहे.जुन्या मतदार याद्या बाद झाल्या आहेत. यासाठी ज्याने २०२२ पर्यंत पदवी (ग्रॅज्युएट) पास झाले आहेत. त्यांनी आपले नाव मतदार यादीत लावावे यासाठी, फॉर्म नं.१८ सोबत लागणारे कागदपत्रे - पदवीची डिग्री किंवा मार्कमेमो, आधारकार्ड, मतदान कार्ड व दोन पासपोर्ट फोटो तसेच महिला उमेदवार किंवा नावात बदल असेल तर पॅनकार्ड किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा गॅझेट यापैकी एकाची झेरॉक्स प्रत,व्हॉट्सअँप, मोबाईल नंबर, ईमेल आयडी व फॉर्म न.१८ इत्यादी. दि.०६नोव्हेंबर पूर्वी वरील दिलेल्या कागदपत्राची झेरॉक्स प्रत कार्यालय क्रांतीनगर पाटोदा. सय्यद साजेद भाई मो.९८५६५६७७७७ यांच्याकडे पदवीधरकांनी मतदार यादीत नाव लावून पदवीधरांची वाढती बेरोजगारी व पदवीधराची चाललेली शैक्षणिक फरपट याचा जॉब विचारण्यासाठी येणाऱ्या पदवीधर निवडणुकीमध्ये आपल्या समस्या अडचण सोडवण्यासाठी पदवीधरांची एकजूट दाखऊया त्यामुळे पदवीधर मतदार यादीत नाव नोंदवून घ्यावे. असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा संचालक सेवा सहकारी संस्था पाटोदा सय्यद सज्जाद यांनी केले आहे.

# केज अतिरिक्त सत्र न्यायालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्याला मंजुरी

केज/प्रतिनिधी

वाढत्या न्यायालयीन कामकाजामुळे जागेची कमतरता भासत असलेल्या केज येथील अतिरिक्त सत्र न्यायालया च्या इमारतीवर दुसरा मजला बांधण्यास शासनाने अखेर मंजुरी दिली आहे.आ. नमिता मुंदडा यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून रु. ७ कोटी ७६ लाख ५० हजारांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

विधी व न्याय विभागाच्या दि.६ ऑक्टोबर रोजी जारी आदेशानुसार, हे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखाली करण्यात येणार आहे.आ.मुंदडा यांनी न्यायालयाच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन शासन दरबारी वारंवार ही मागणीमांडली होती. या मंजुरीमुळे केज तालुक्यातील न्याय व्यवस्थेसाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास होणार



असून,नागरिकांसाठी अधिक सुटसुटीत आणि सुविधा-संपन्न व्यवस्था उपलब्ध होणार आहे.या कामासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री पंकजा मुंडे यांचे आमदार नमिता मुंदडा यांनी आभारमानले आहेत.

# बीडच्या आपत्तीग्रस्तांना मदत, विकासात्मक प्रकल्प यासह आगामी निवडणुकांवर पालकमंत्री अजितदादा समवेत डॉक्टर योगेश क्षीरसागर यांची मुंबईत महत्त्वपूर्ण चर्चा

## भैय्यांच्या भेटीनंतर बीडच्या राजकीय गोटात खलबत्तांना उधाण

बीड /प्रतिनिधी

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबई येथे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांची सोमवारी (दि.६) भेट घेऊन विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली. यावेळी बीड व शिरूर कासार तालुक्यातील आपत्तीग्रस्त भागांचे पुनर्वसन, विकास प्रकल्प आणि आगामी स्थानिक निवडणुका या विषयांवर सखोल चर्चा झाली.

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथील भूस्खलनाच्या गंभीर परिस्थितीबाबत डॉ.क्षीरसागर यांनी अजितदादांचे लक्ष वेधले. त्या ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांच्या पुनर्वसनासाठी तसेच त्यांना सुरक्षित ठिकाणी आश्रय देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी मागणी त्यांनी केली. यासंदर्भात पालकमंत्री अजितदादांनी प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. हिंगणी खुर्द गावात पाणी शिरल्याने झालेल्या नुकसानीबाबतही चर्चा झाली. या भागातील पंचनामे, मदत व गाव पुनर्वसनाच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी डॉ.क्षीरसागर यांनी केली. तसेच बीड शहरातील डीपी रस्ते प्रकल्पालाही अजितदादा पवार यांनी सकारात्मकता दर्शवली. तसेच, अन्य रस्त्यांसाठी डीपीसीव्यतिरिक्त राज्य शासनाकडून अतिरिक्त निधी दिला जाणार आहे.

नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ठोक तरतूद हेडमधून मिळणार साडेआठ कोटींचा



निधी

बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी नगरविकास विभागाच्या ठोस तरतूद हेडमधून नाट्यगृह उभारण्यासाठी लवकरच साडेआठ कोटींचा निधी उपलब्ध करून देण्याचा सकारात्मक निर्णय अजितदादांनी घेतल्याचे डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत झाली चर्चा

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत डॉ.योगेश क्षीरसागर व अजितदादा पवार यांच्यात सविस्तर चर्चा झाली. यावेळी अजितदादांनी मार्गदर्शन केले असून पूर्ण ताकदीने निवडणुका लढविल्या जाणार आहेत.

# कपिलधारवाडीत जमीन खचली; तातडीने सर्वेक्षण करा खा.बजरंग सोनवणे यांचे भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाला पत्र

बीड/प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली ग्रामपंचायत हद्दीतील कपिलधारवाडी परिसरात निर्माण झालेल्या जमिनी तील भेगा व जमीनखचणे या गंभीर भूगर्भीय परिस्थितीवर तातडीने वैज्ञानिक भूगर्भ सर्वेक्षण करण्यात यावे,असे पत्र खा.बजरंग सोनवणे यांनी महानिदेशक,भारतीय भूगर्भ सर्वेक्षण (ऋडख), भारत सरकार,नवी दिल्ली यांना दिले आहे. खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे, कपिलधारवाडी गाव व त्याच्या परिसरात (पाली ग्रामपंचायत) गेल्या काही दिवसांपासून अत्यंत गंभीर भूगर्भीय स्थिती निर्माण झालेली आहे,या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. अलीकडच्या काही दिवसांत या परिसरात जमिनीत मोठ्या भेगा पडल्याचे दिसून आले असून त्या झपाट्याने वाढत आहेत.अनेक ठिकाणी जमीन खचल्याचेही स्पष्ट दिसते. त्यामुळे परिस्थिती अत्यंत गंभीर बनली असून स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतजमिनी, घरं,सार्वजनिक रस्ते इत्यादींना संभाव्य धोका निर्माण झाला आहे.या घडामोडींच्या स्वरूपा वरून हे स्पष्ट होते की या भागात अनपेक्षित व धोकादायक भूगर्भीय बदल होत आहेत.या परिस्थितीच्या गांभीर्याचा तातडीने विचार करून भारतीय भूगर्भ सर्वेक्षण विभागाने (ऋडख) केंद्रा तील तज्ञांची टीम तातडीने



पाठवून कपिलधारवाडी परिसर व आजूबाजूच्या भागाचा सखोल भूगर्भीय व भू-तांत्रिक सर्वेक्षण करावे.या सर्वेक्षणाद्वारे भूस्खलन व भेगा पडण्या मागील शास्त्रीय कारणे शोधावीत व तात्काळ प्रतिबंधक व सुधारात्मक उपाय सुचवावेत. आवश्यक असल्यास पर्यावरण,वन व हवामान बदल मंत्रालय तसेच राष्ट्रीय आपत्तीव्यवस्थापन प्राधिकरण (छञ्च-) यांच्याशी समन्वय साधून बाधित क्षेत्रातील सुरक्षिततेची खात्री करावी आणि पुढील मानवी व पर्यावरणीय हानीटाळावी.या विषयाचे आपत्तीजन्य व तातडीचे स्वरूप लक्षात घेऊन या प्रकरणास प्राधान्य देऊन आपल्या प्रादेशिक तसेच केंद्रीय विभागांतून तातडीने कार्यवाही करावी,असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे.याचआशयाचे निवेदन राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेन्द्र फडणवीस,उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री श्री. अजित दादा पवार यांना देऊन या गंभीर बाबीकडे राज्य शासनाचे लक्ष वेधले आहे.

# शिवणीत आज आश्विन पौर्णिमेनिमित्त धम्मउत्सव - भिक्खु धम्मशील थेरों

बीड /प्रतिनिधी

तालुक्यातील शिवणी येथील महाविहार धम्मभूमी डॉ.आनंद कौसल्यायन नगर येथे, आश्विन पौर्णिमा व वर्षावास समापन निमित्ताने मंगळवार (ता.७) रोजी दुपारी १२ वाजता धम्मदेसना व भोजनदान तसेच सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. बौद्ध उपासक-उपासिका यांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.

बीड शहरात बौद्ध धम्म प्रचाराच्या निमित्ताने विहारात वर्षाकाळात वर्षावास करुन, धम्मप्रचाराचे काम जलदगतीने होत आहे. त्यांच्या १३ व्या वर्षावास समारोपाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी १० वाजता ऐतिहासिक बोधी वृक्षाची पूजा, भोजनदान, दुपारी १२ वाजता बुद्ध वंदना, त्यानंतर धम्मदेसना, सत्कार व मार्गदर्शन होणार आहे. यावेळी भन्ते बुद्धबोधी यांची धम्मदेसना होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून फुले आंबेडकरी चळवळीतील कृतीशील कार्यकर्ते अनिल डोंगरे, प्रा.डॉ.विक्रम धन्वे उपस्थित राहणार आहेत. तसेच संपादक नितीन मूजमुले यांनी बौद्ध धम्म स्वीकारण्याची घोषणा केल्याबद्दल त्यांचा विशेषतः सत्कार समारंभ होणार आहे. दरम्यान बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्याकडून भोजनदान दिले जाणार आहे. तसेच अखिल भारतीय सहावी बौद्ध धम्म परिषद यशस्वी करणाऱ्या उपासक-उपासिका यांचा विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमात बौद्ध उपासक-



उपासिका यांनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन उपस्थित रहावे असे आवाहन प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था सचिव भिक्खु धम्मशील थेरो यांनी केले आहे.

# पत्रकार अशोक भालेराव यांचे अपघाती निधन

नांदेड : - तामसा येथून जवळच असलेल्या वायपना (बु.) येथील पत्रकार अशोक मानेजी भालेराव यांचे नांदेड येथील शासकीय रुग्णालय उपचारादरम्यान निधन झाले असून मृत्युसमयी त्यांचे वय ५८ वर्ष होते. दि. ६ ऑक्टोंबर रोजी सोमवारी दुपारी त्यांच्या पार्थिव देहावर वायपना (बु.) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

पत्रकार अशोक भालेराव यांनी तामसा वार्ताहर म्हणून अनेक वर्तमान पत्रात जवळपास ३५ वर्ष काम केले आहे. आपल्या लेखणीतून शेतकरी, मजूरदार, महिला, वंचित, शोषित, पिढीत, बेरोजगारांना न्याय देण्याचे कार्य केले. साप्ताहीक रेंगुटचे ते संपादक होते. तामसा येथून वायपना येथे दुचाकीवरून जातांना झालेल्या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. नांदेड येथील शासकीय



रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान सोमवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, नातू असा परिवार आहे. हदगाव तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आला

# किट्टी आडगाव येथील तलावात गेलेल्या जमिनीचा शासनाने मावेजा द्यावा- सरपंच रूक्मानंद खेत्रे

माजलगाव /प्रतिनिधी: तालुक्यातील किट्टी आडगाव येथे गावालगत असलेल्या तलावातील पाण्याने गावातील काही शेतक-यांची जमिन बाधित होत असुन त्यांना उत्पन्न घेत येत नाही. त्यामुळे शासनाने सदरील जमिन अधिग्रहीत करून शेतक-यांना मावेजा द्यावा अशी मागणी सरपंच रूक्मानंद खेत्रे यांनी केली आहे.

तालुक्यातील किट्टी आडगाव गावालगत जि.प. अंतर्गत असलेला तलाव पावसाळ्यात दरवर्षी भरतो. त्या तलावाशेजारीच गट नं. ७६१/ ११९ मधील क्षेत्रफळ २ हेक्टर ४ गुंठे जमिन ही रमेश त्र्यंबक तेहरे, राधाकिसन तेहरे, शिवाजी तेहरे, महादेव तेहरे, सुरेश तेहरे या शेतक-यांच्या मालकीची असुन त्यांना या शेतात उत्पन्न काढता येत नाही. त्यामुळे शासनाने सदरील जमिन अधिग्रहीत करून तलावात समाविष्ट करावी व शेतक-यांना इतर ठिकाणी शेती घेण्यास मावेजा देण्यात यावा असा ठराव ग्रामपंचायत कार्यालयाने घेतला आहे. सदरील जमिन अधिगृहीत करून तलावात समाविष्ट केल्यास तलावाचे क्षेत्र व साठवण क्षमता वाढुन वाहुन जाणारे पाणी साठवण्यास मदत होणार असुन गावाचा पाणीप्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ निर्णय घेवुन तलावात गेलेल्या जमिनीचे अधिग्रहण करून संबंधित शेतक-यांना मावेजा द्यावा अशी अग्रही मागणी विद्यमान सरपंच रूक्मानंद खेत्रे यांनी केली आहे.

# सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे उद्घाटन

माजलगाव (प्रतिनिधी) : भाशिप्र संस्थेच्या येथील सिद्धेश्वर महाविद्यालयात आजीवन शिक्षण विस्तार केंद्राचे नुकतेच उद्घाटन उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी उपस्थित होते.

याप्रसंगी उद्घाटक म्हणून बोलताना डॉ. गजानन होंन्ना म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर यांनी आपल्या महाविद्यालयास वेगवेगळे आठ कोर्सेस आजीवन शिक्षण विस्तार विभाग अंतर्गत राबवण्यास दिले आहेत. ते आपण महाविद्यालय म्हणून प्रभावीपणे राबवू. अध्यक्षीय समारोपातप्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, कौशल्य विकास व्हावा या दृष्टीने विद्यापीठाने दुग्ध व्यवसाय,ड्रेस मेकिंग अँड डिझायनिंग,बालवाडी अंगणवाडी,ग्रामीण पत्रकारिता,ग्रंथालय व्यवस्थापन,विक्री प्रतिनिधी,सौंदर्य संवर्धन व व्यक्तिमत्व विकास,सर्टिफिकेट कोर्स इन इनकम्युनिकेटिव्ह इंग्लिश हे सर्व कोर्सेस सुरू केले आहेत.

समाजातील वेगवेगळे घटक जे दहावी व बारावी उत्तीर्ण आहेत असे व्यक्ती या कोर्सेसला प्रवेश घेऊ शकतात व आपला कोर्सेस पूर्ण केल्यानंतर या माध्यमातून ते आपला स्वयंरोजगार प्राप्त करू शकतात. प्रास्ताविक समन्वयक डॉ. बाळासाहेब मुंडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. जिजाराम बागल यांनी केले तर आभार प्रा. अशोक होके यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महायुती भाजप , शिंदे शिवसेना , अजीत दादा राष्ट्रवादी, नेते चमकोगिरीत जोमात तर ?

## महाविकास आघाडीतील कॉँग्रेस , राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार ) , शिवसेना (ठाकरे ) पक्षाचे नेते कोमात ?

अनिल धमने (पाटील)
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

नांदेड :- नांदेड जिल्ह्यात येत्या थोडक्याच दिवसावर निवडणुक येऊन ठेपलेल्या असून नांदेड वाघाळा महानगर पालीका व जिल्हा परिषद पंचायत समिती यासह ग्रामपंचायत निवडणुक ऐन तोंडावर आलेली आहे त्यामुळे महायुतीली सर्वच राजकीय पक्षानी पुरग्रस्त परिस्थिती च्या माध्यमातुन आप आपल्या पक्षाची व स्वता ची चमकोगिरी करूण राजकीय पोळी भाजण्याचे प्रयत्न करीत असल्या चे दिसून आले आहेत तर यामध्ये सर्वांत आघाडीवर भाजपा पक्षाचे आमदार व नेते मंडळी दिसून आले तर त्या पाठोपाठ राष्ट्रवादी कॉंग्रेस आजीत पवार (गट) त्या नंतर शिंदे शिवसेना हे तिन्ही पक्ष आप आपल्या पद्धतीने पूर परिस्थितीची पाहणी असेल की पूर ग्रस्त यांना मदत असेल आशा माध्यमातून सहानुभुती दाखवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसुन आले तर काही ठिकाणी महायुतीतील आमदार यांना शेतकऱ्यांच्या रोषाला सामोर जावा लागले तर काही ठिकाणी संतप्त झालेले शेतकरी यांनी सत्तेतील आमदार यांची गाडी आडवुण त्यांना आरेरावी करीत जाब विचारला की तुम्ही सर्व जण कोरडी सहानुभुती दाखण्याचा प्रयत्न करण्या पेक्षा विधान भवन येथे नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची भक्कम पणे बाजू मांडुन शेतकरी यांना निसर्गाचा पुढील सामना करण्यासाठी चांगल्या पद्धतीने पूरग्रस्त परिस्थितीवर मात करण्यासाठी शासना मार्फेत मदत करून द्यावे अन्यथा सत्तेतील एकाही आमदारांना नांदेड जिल्ह्यात फिरू देणार नसल्याचे सांगितले .

नांदेड जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील शेतकरी बांधवांनी सत्तेतील अनेक आमदार यांना बोलुन दाखवल्या चे समजते कारण येत्या काहीच दिवसात जिल्हा परिषद पंचायत समिती महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीसाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांचे बैठका व गाठी भेटी वर मोठया प्रमाणात भर दिल्याचे दिसून येत आहेत महायुतील तिन्ही पक्षाचे नेते मंडळींनी ही निवडणुक आम्ही आमच्या पक्षाच्या वतीने सर्व ताकदीनीशी लढवु असेच बोलले जात आहे निवडणूकीच्या अनुषंगाने सध्या तरी नांदेड जिल्ह्यातील महायुतीतील नेते मंडळी च्या हालचालींना वेग आल्याचे दिसते //महायुतीतील नेते जोमात तर महाविकास आघाडीतील नेते कोमात असल्याचे दिसते// कारण महाविकास अघाडी कॉंग्रेस राष्ट्रवादी आणि ठाकरे शिवसेने या पक्षाकडून निवडणूक सर्दभात कुठल्याही हालचाल सुरू असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे महायुती जोमात तर महाविकास अघाडी कोमात ? असल्याची चर्चा नांदेड शहर सह जिल्ह्यात आहे ..!

महायुती भाजपाचे नेते माजी मुख्यमंत्री, खा,अशोक चव्हाण यांच्या नेतृत्व खाली





स्थानिक निवडणूक लढविणार, असल्याने मनपा जिल्हा परिषद पंचायत समिती यांचा भाजपाला पक्षाला निवडणूकीचा दांडगा अनुभव असल्याने पुढील रणनीती यशस्वी करण्यासाठी, जिल्ह्यात भाजपचे पाच आमदार तर राज्यसभेचे दोन खासदार आहेत त्यामुळे सध्या तरी भाजपाची परिस्थिती बरी असल्याचे दिसून येते जिल्हा परिषद मनपा पंचायत समिती निवडणूककीसाठी जोरदार तयारीत असून पदधिकारी कार्यकर्ते जेष्ठ नेते हे ईच्छूकांना निवडणूकसाठी पाठबळ देऊ बैठका लावा कामाला लागा आशा प्रकार च्या कानपिचक्या कार्यकर्ते यांना दिल्या आहेत या निवडणूक रणधुमाळी च्या पार्श्वभूमीवर माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण हे लक्ष ठेवून पुर्ण वेळ भाजपचे महानगध्यक्ष अमर राजूरकर यांना मनपा हद्दीत विशेष लक्ष ठेवण्याचे सुचना दिल्याचे कळते निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भाजप जोमात असल्याचे दिसून येत आहे तर नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते मा,खा, विद्यमान आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली नांदेड वाघाळा महानगर पालीका व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुक राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट लढविणार आहे नांदेड जिल्ह्यात पक्ष एक नबंर असावा म्हणून ते प्रयत्न करीत आहेत कारण महायुती मध्ये सध्या तरी नांदेड जिल्ह्यात राष्ट्रवादी कांग्रेस चा प्रताप पाटील चिखलीकर यांच्या रुपाने एकच आमदार आहेत तरी ते पुढील निवडणुकी च्या अनुषंगाने आघीडीवर असल्याचे दिसुन येतात कारण नांदेड जिल्ह्यातील पाच विधानसभा क्षेत्रातील पाच माजी आमदारांचा पक्ष प्रवेश करून घेऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाला एक नंबर करण्याचा प्रयत्न जोरदार प्रयत्न सुरू केला आहे जिल्ह्यात राष्ट्रवादीचा विद्यमान एकच आमदार स्वतः चिखलीकर आहेत त्यामुळे येणाऱ्या जिल्हा परिषद मनपा निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला ० पासून सुरुवात करीत एक नंबर होण्यासाठी आमदार चिखलीकर हे रात्र दिवस एक करून जोरदार मेहनत घेत आहेत जुन्या व नव्या सहकार्यांना राष्ट्रवादीमध्ये खेचून घेण्यासाठी सुरुवात केली आहे निवडणुकीत जिल्हा परिषद आणि मनपा पंचायत समितीमध्ये स्वतःची ताकद दाखवून जिल्ह्यात एक नंबर होण्याचा विडा राष्ट्रवादीने उचललेला आहेत मात्र नांदेड दक्षिणचे माजी आ मोहनराव हंबर्डे या निवडणूकीच्या सदर्भात सध्या तरी थंड असल्याचे दिसतात येणाऱ्या निवडणूकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस घडी वेगाने राहील अशी परिस्थिती निर्माण झाली का शिवसेना शिंदे

गटाची मदार विधान परिषदेचे आ हेमंत पाटील यांच्यावर नांदेड जिल्ह्याची जबाबदारी आहे मात्र सध्या तरी निवडणुकी च्या अनुषंगाने हेमंत पाटील कुठेही प्रसिद्धी च्या जोतात असल्याचे दिसून येत नाहीत नांदेड मनपा व जिल्हा परिषद मध्ये सध्या तरी त्यांचे लक्ष असल्याचे दिसत नाही जिल्ह्यामध्ये शिवसेनेचे विद्यमान चार आमदार आहेत त्यामुळे शिवसेनेची ताकद मोठी आहे उत्तर विधानसभेचे आमदार बालाजी कल्याणकर हे मात्र महानगर पलिका व जिल्हा परिषद या निवडणुकीसाठी जोरदार तयारीत असल्याचे दिसते शिवसेनेचे नेते मोठ्या प्रमाणात आहे, नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघ आनंदराव तिडके बोंढारकर यांच्याकडे असल्याने या भागातील निवडणुकीच्या बाबत सध्या तरी ते कुठे ही निवडणुकीची प्रसिद्धी करताना दिसून आले नसुन शिवसेने मध्ये माजी नगरसेवक माजी जिल्हा परिषद सदस्य मोठ्या संख्येने असल्याने कासव पध्दतीने शिवसेने चे काम चालू आहे कारण उत्तर दक्षिण हे दोन्ही मतदार संघ शहराचे भाग मनपाचे क्षेत्रात असल्याने भविष्यात महायुती न झाल्यास राष्ट्रवादी कॉँग्रेसचे अजित दादा गट व शिवसेन शिंदे गट एकत्र लढल्यास भाजपाची सर्वात मोठी डोकेदुखी वाढणार आसल्याचे राजकीय जानकारांचे मत आहे मनपाच्या व जिल्हा परिषद च्या निवडणूकीसाठी कॉंग्रेसकडून थोडेफार प्रयत्न चालू केले आहेत कारण नांदेड जिल्ह्याची मदार कॉंग्रेस चे खा रविंद्र चव्हाण यांच्या वर असल्याचे दिसून येते कारण कॉंग्रेसकडून खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेस जिल्ह्यात निवडणुका लढविणार असून माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्या सह अन्य बडे नेते एन वेळी पक्ष सोडून गेल्याने अनेक दशका पासून सत्तेत असलेल्या कॉंग्रेस पक्षाला आजवर नांदेड जिल्ह्यात एक नंबर चा असलेला पक्ष या निवडणुकीत पक्षाची ताकद पक्ष नेतृत्वाने दाखवून द्यावी लागणार आहे जिल्ह्यात एकमेव खासदार असल्याने रवींद्र चव्हाण यांची येत्या निवडणुकीत फार मोठी परिक्षा असून या परीक्षा मध्ये पास होतील का हेच पाहावे लागेल ..!

महाविकास आघाडीतील कॉंग्रेस पक्षाने वेगाने हालचाली सुरुवात केली असले तरी ठाकरे शिवसेना व शरचंद्र पवार राष्ट्रवादी हे दोन्ही पक्षाचा एकही प्रतिनिधी नसल्याने या पक्षाला चांगलाच फटका बसन्याचे चित्र दिसत आहे स्थानिक निवडणुकीसाठी हे पक्ष सध्यातरी पावसाळ्यात थंडी च्या वातावरणा मुळे की काय सध्या तरी थंडच असल्याचे दिसत आहेत .



## शासकीय महाविघालय विष्णुपुरी येथील परिचारिका संघटनेच्या वतीने पुरग्रस्तांना अन्नधान्य किटचे वाटप

नांदेड -डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथील परिचारिकांच्या वतीने परिचारिका संघटनेच्या माध्यमातून पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूच्या अन्नधान्य चे २०० किटचे वाटप सामाजिक बांधिलकी जोपासत केले असून या उपक्रमाचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातील पूर परिस्थिती लक्षामध्ये घेता महाराष्ट्रातील काही भाग जसे कि, नांदेड परभणी लातूर सोलापूर बीड आदि भागामध्ये पूर परिस्थिती मुळे शंभर टक्के शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान झाल्याचे पहावयाला मिळाले आहे. आपल्या सर्वांचा पोशिंदा आपला शेतकरी मात्र सर्व काही पूर परिस्थिती मध्ये गमावून बसला होता. शेतकऱ्यांच्या डोळ्यात आणि घरात व तसेच शेतात पाणीच पाणी उरले होते हजारो हेक्टर जमीन पाण्या खाली होती, घरा दारात पाणीच पाणी झाले होते, गुरे जाणवरे देखील पुरात वाहून गेल्याचे आपण सर्वांनी समाज माध्यमातून तसेच प्रत्यक्षरित्या बघितले. जगाला शेतीच्या माध्यमातून अन्न पुरविणाऱ्या आपल्या शेतकरी राजावर दुःखाचा डोंगर कोसळला होता.

महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा नांदेड च्या वतिने डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णुपुरी नांदेड येथील सर्व परिचारिका वर्गाला आर्थिक मदती साठी आवाहन करण्यात आले होते.सामाजिक बांधिलकी जोपासत पूरग्रस्तांना लागणाऱ्या तांदूळ,साखर , गोडतेल, गव्हाचे पीठ,चहा पावडर,तिखट, हळद ,बिस्कीट,मिठपुड,डाळ व ब्लँकेट अशा जीवनवश्यक वास्तूचे एकत्रित संकलन करून संस्थाप्रमुख अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख,यांच्या अध्यक्षतेखाली, व तसेच रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजयकुमार कापसे,रुग्णालयाच्या मेट्रोन श्रीमती अल्का जाधव,उप -वैद्यकीय अधीक्षक डॉ.शिवानंद , महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना शाखा नांदेड विष्णुपुरी च्या अध्यक्षा श्रीमती.प्रतिभा वाघदरीकर,सचिव केशव जिंकलवाड, सल्लागार श्रीमती.रेवता सामलवार, संघटक श्रीमती.अर्चना मुंगल तसेच देणगीदार परिचारिका वर्ग यांच्या उपस्थितीत सदरील जीवनावश्यक वस्तूंचे अनावरण

# आदिवासी समाजाचा नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य आरक्षण बचाव मोर्चा

## एसटी प्रवर्गात खुसखोरी करणाऱ्यांना हाणून पाडू आमदार भीमराव केराम

अनिल धमने (पाटील)
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

नांदेड : दि ६ ऑक्टोंबर रोजी नांदेड येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर सकल आदिवासी समाजाच्या वतीने सोमवार दि ६ आक्टोंबर रोजी भव्य विराट उलगुलान आरक्षण बचाव महामोर्चा काढण्यात आला होता या मोर्चात आदिवासी समाजातील महिला पुरुषांनी हजारोच्या संख्येने आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते अनुसूचित जमाती एसटी प्रवर्गात समावेश करून आरक्षण लागु करण्याच्या मागणीसाठी बंजारा व धनगर समाजाच्या वतीने राज्यात ठीक ठिकाणी मोर्चे काढले जात आहेत या मोर्चांना विरोध करण्यासाठी सकल आदिवासी समाज एक वठला होता . हैदराबाद गॅझेटीयर मधील संदर्भ देऊन बंजारा समाजाच्या वतीने एसटी आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या आठवड्यात जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून शक्तिप्रदर्शन केले होते त्यानंतर सकल आदिवासी समाजाच्या वतीने आरक्षण बचाव ग उलगुलान महामोर्चाचे दिनांक ६ ऑक्टोंबर सोमवार रोजी आयोजन करण्यात आले होते सोमवारी पहाटे पासूनच नांदेड शहर व परिसरात मुसळधार पावसाने हजेरी लावली होती सकाळी ९ वाजेपर्यंत पाऊस सुरू असल्यामुळे मोर्चाकरांची चांगलीच धावपळ होऊन तारांबळ उडाली होती नवामोंढा येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मैदानावर भारतीय राज्यघटनेचे शिल्पकारडॉक्टर बाबासाहेब आंबेडकर भगवान बिरसा मुंडा व राष्ट्र पुरुषांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यानंतर आदिवासी समाजाच्या उलगुलान महामोर्चाला प्रारंभ झाला या मध्ये हजारो आदिवासी बांधव पारंपारिक वेशभूषा परिधान करून सहभागी झाले होते यात आदिवासी बांधवांच्या कलापथकांनेही नांदेडकरांचे लक्ष वेधले या मोर्चात आदिवासी महिला व पुरुष हाता मध्ये झेंडे घेऊन आरक्षण बचाव च्या घोषणा देत मोर्चात सहभागी झाले होते हा महामोर्चा नवा मोंढा हिंगोली गेटवर ब्रिज चिखलवाडी महात्मा गांधी पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला आदिवासी समाज संघटनेने संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष वानोळे यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले त्यानंतर मोर्चाचे रूपांतर विराट जाहीर सभेत झाले यावेळी बोलताना आमदार भीमराव केराम म्हणाले की राज्यातील बंजारा समाज हा श्रीमंत समाज म्हणून ओळखला जातो या समाजाच्या नेत्याचे राज्याचे अनेक वर्षे मुख्यमंत्री पद सांभाळले आहे बंजारा समाजाच्या नेत्यांनी हैदराबाद गॅजेटियर मधील १९२० च्या संदर्भ देत बंजारा समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षण लागू करण्याची मागणी करून समाजातील तरुणांचे डोके

भडकवण्याचे काम सुरू केले आहे आणीबाणीच्या काळानंतर तात्कालीन आंध्रप्रदेशात मोर्चे काढून व दबाव टाकून आरक्षणाचा अध्यादेश काढायला लावला आहे परंतु महाराष्ट्रात एसटीच्या आरक्षणाला धक्का लावण्याचा कोणी प्रयत्न करू नये एसटी प्रवर्गातील आरक्षणातील खुसखोरी करण्याचे षडयंत्र आम्ही हाणून पाडू असा इशारा आमदार भीमराव केराम यांनी दिला आहे धनगर व बंजारा समाजाकडून एसटी प्रवर्गाच्या मागणीसाठी आंदोलने व मोर्चे काढण्यात येत आहेत त्यामुळे आदिवासी समाज हा भयभीत झाला आहे राज्य सरकारने आदिवासी समाजाच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आरक्षणाचा विषय हा केंद्र सरकारच्या आखत्यारीतला असून धनगर व बंजारा समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देता येणार नसल्याचे न्यायालयाच्या निकालावरून यापूर्वी स्पष्ट झालेले आहे बंजारा समाज भटक्या विमुक्त जमाती व्हिजे एनटी मध्ये असल्याचे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १९३० मध्ये स्पष्ट केले होते भारतीय संविधाना मध्ये आदिवासी समाजाच्या आरक्षणाला संरक्षण दिले असून कुणीही संविधानाला आव्हान देण्याचा प्रयत्न करू नये आदिवासी समाजाचे मोर्चे हे हक्काचे आरक्षण बचावासाठी काढले जात असून मोर्चाच्या माध्यमातून हा एक सरकारला इशारा देण्यात आला आहे सरकारने आदिवासी समाजाच्या भावनाशी खेळण्याचा प्रयत्न करू नये बनावट आदिवासींनी प्रमाणपत्र काढून शासनाच्या नोकरी मिळवल्या आहेत त्यांच्या चौकशीसाठी २०१७ साली सरकारने एसआयटीची स्थापना केली एसआयटी चा अहवाल अजून सरकारने जाहीर




केलेला नाही तो अहवाल तात्काळ जाहीर करावा मूळ आदिवासींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न सरकारने करू नये असा इशारा आमदार भीमराव केराम यांनी दिला आहे यावेळी आमदार सुनील भोसा माजी आमदार संतोष टारपे माजी आमदार सुनील काळे जिल्हा परिषदच्या माजी अध्यक्ष जनाबाई डुडुळे प्रा . विजय खुपसे . यांच्यासह आदिवासी समाजाच्या काही नेत्यांची भाषणे झाली या मोर्चात सुभाष वानोळे लकी भाऊ जाधव बाबुराव नाईक संतोष तायवाडे प्रशांत बोडके मंथन वाळके डॉ संजय मुरमुरे अरुण डाकोरे . डॉ संतोष सुपडे .देवानंद मिराशे . रामभाऊ खरोडे यांच्यासह हजारो आदिवासी समाज बांधव व आदिवासी समाज संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते विद्यार्थी महिला पुरुषांची हजारोंच्या संख्येने उपस्थिती होती

## पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे एनडीआरएफ तर्फे आपत्ती व्यवस्थापन विषयी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

नांदेड : आपत्ती व्यवस्थापन अधिकारी किशोर कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एनडीआर एफ नॅशनल डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स चा टिमने प्रत्यक्ष डेमो घेऊन प्रत्याक्षीक ६ ऑक्टोबर रोजी शाळेच्या प्रांगणात सादर केले यावेळी शाळा व्यवस्थापन समिती शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विध्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी ही शाळा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमामध्ये लातूर विभागात शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये प्रथम आलेली शाळा असून, नेहमीच विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रम या शाळेमध्ये राबवले जातात, त्याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी कार्यालया मार्फत आज दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नांदेड, किशोर कोरे व आपत्ती व्यवस्थापन तज्ञ गौरव तिवारी जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या प्रयत्नाने प्रस्तुत शाळेमध्ये विद्यार्थ्यांना एनडीआरएफ नॅशनल




डिझास्टर रिस्पॉन्स फोर्स च्या माध्यमातून बटालियन नंबर ८ चैका टीमने त्यांचे टीम प्रमुख राजेंद्र कांबळे या टीमचे यांच्या पि.आय. मार्गदर्शना खाली शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पाचवी ते दहावीच्या दहावीच्या जवळपास बाराशे विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन या संदर्भात प्रत्यक्ष डेमो घेऊन प्रशिक्षण देण्यात आले. भारत सरकारने २००६ यावर्षी एन डी आर एफ नावाची एक स्वतंत्र यंत्रणा उभा करून याचे आठ बटालियन स्थापन केले होते. नंतर याचा विस्तार करून १६ बटालियन करण्यात आले, प्रत्येक बटालियनचे स्वतंत्र १८ टीम असतात आणि यांच्या माध्यमातून संपूर्ण देशामध्ये ज्या ठिकाणी नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना सुरक्षित ठेवण्याच्या हेतूने आणि नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी या उद्देशाने एनडीआरएफ च्या माध्यमातून आपत्ती व्यवस्थापनाचे काम केले जाते. भूकंप, पूर परिस्थिती, इत्यादी काळामध्ये नागरिकांना मदत करण्याचे काम यांच्या माध्यमातून केले जाते. पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या ठिकाणी बटालियन नंबर ५ टीमने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना जवळपास दोन तास याची प्रशिक्षण देऊन या संदर्भामध्ये विद्यार्थ्यांना माहिती दिली आणि प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये कशा पद्धतीने स्वतःला सुरक्षित ठेवता येते आणि इतरांचे जीव कसा वाचवता येते या संदर्भामध्ये प्रात्यक्षिक करून दाखवले.

या कार्यक्रमाला शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजूभाऊ हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबरावजी हंबर्डे,गोविंदराव हंबर्डे,विश्वनाथरावजी हंबर्डे,माधोजी भारती,माणिकरावजी हंबर्डे, भगवानराव हंबर्डे,राजेश हंबर्डे,व ग्रामसेवक संजय कानोडे,मंडळ अधिकारी कानोडे ,यांची विशेष उपस्थिती होती,या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए.खदीर यांनी केले तर आभार शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वलाताई जाधव ,यांनी करून या टीमचे विशेष आभार मानले.




## महा आक्रोश रास्ता रोको आंदोलनाला अभूतपूर्व प्रतिसाद

शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करून कर्जमाफी करण्यासाठी रास्ता रोको आंदोलन संपन्न

माहूर : - नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देऊन तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी यासाठी मौजे सारखणी येथे दी ६ रोजी तीन तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी माहूर तालुक्यातील जवळपास सर्वच गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते आंदोलकांनी निवेदन सिंदखेड चे सपोनि रमेश जाधव यांनी स्वीकारलेकिनवट माहूर तालुक्यातील शेतकरी बांधवांनी सरकारचा जाहीर निषेध म्हणून आंदोलन करण्यात आले जवळपास राष्ट्रीय महामार्गावर सारखणी येथे तीन तास रास्ता रोको करण्यात आला एपीआय रमेश जाधवर यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सुद्धा देण्यात आला आहे सोबतच उपोषणास बसलेले मंगेश साबळे यांचे शेतकऱ्यांसाठी जवळपास सात दिवसापासून आमरण उपोषण चालू आहे त्यांचे सुद्धा निवेदन तहसीलदार साहेबांना एपीआय रमेश जाधव यांच्या मार्फत दिले रस्ता रोको ला अनेक शेतकऱ्यांनी संबोधित केले शेतकऱ्याला एकरी ५० हजार रुपये मदत तात्काळ जाहीर झाली पाहिजे शेतमजूर आहेत त्यांचे घर धान्य साठा वाहून गेले घरा पडझड शेतमजूर झालेली आहे त्यांना सुद्धा ५० हजाराची मदत तात्काळ जाहीर झाली पाहिजे त्यानंतर शेतकऱ्याची कर्जमाफी त्वरित होऊन नवीन कर्ज शेतकऱ्याला उपलब्ध करून द्यावे प्रामुख्याने आंदोलनकर्त्याची हीच मागणी होतीयावेळी त्रिभुवन सिंह ठाकुर शेतकरी संघटना यांची सुद्धा प्रामुख्याने उपस्थित होती बजरंग वाढगुरे अमोल आडे बालाजी टनमने मिलिंद कांबळे सारखणी ईश्वर परेकर शेलू अरविंद कदम वायफनीकर शुभम शेंद्रे बालाजी गायकवाड अरुण राठोड रुपेश राठोड श्रीकांत कदम प्रकाश बंडेवार संजय सूर्यवंशी ऋषिकेश चौधरी वामन शेंडे तसेच असंख्य शेतकरी बांधव उपस्थित होते आयोजक पिंटू आशीर्वाद पाटील यांनी सर्वांचे आभार मानले रास्ता रोको आंदोलन दरम्यान सपोनी रमेश जाधवर यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता